जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि.07-02-2020
लोकसत्ता

# जागतिक तापमान वाढीचे संकट पर्यावरण जतनातून रोखावे

## राज्यपाल कोश्यारी यांचे आवाहन

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** आई, मातृभाषा, पर्यावरण आणि भारतमाता या चार मातांना मानवी जीवनात अनन्य साधारण महत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येकाने या मातांचा आपल्या जीवनात आदर करणे महत्त्वाचे आहे. पर्यावरण जोपासून जागतिक तापमान वाढीचे संकट रोखण्याकामी विद्यार्थ्यांनी सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ राज्यपाल कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी विद्यापीठात पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन हे उपस्थित होते. या वेळी ६० हजार १६७ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आल्या.

विद्यार्थ्यांनी अभ्यासात स्वयंशिस्त आणि सातत्य ठेवून उच्च ध्येय जोपासावे, असे आवाहन करून राज्यपाल कोश्यारी म्हणाले, आपण जे काम हाती घेता तसेच करता ते समर्पणाच्या भावनेतून प्रामाणिक हेतूने करावे. त्यासाठी इच्छाशक्ती आणि दृढ संकल्प जोपासून आपले ध्येय साध्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.




राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते श्रीराम अभिषेक यांस राष्ट्रपती पदक देऊन सन्मानित करण्यात आले.(छाया - राज मकानदार)

देशातील शिक्षण पद्धतीमध्ये यापुढील काळात गुरुकुल शिक्षण पद्धतीचा अवलंब व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करून विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन म्हणाले, सध्याच्या कुलगुरू शिक्षण पद्धतीत सुधारणा करून गुरुकुल शिक्षण पद्धती अंगीकारणे गरजेचे आहे. गुरुकुल शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांची सुप्त क्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला निश्चितपणे प्रेरणा मिळेल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला.

भूषण पटवर्धन : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ उत्साहात; कोल्हापूरचा अभिषेक श्रीराम, साताऱ्याची कीर्ती ननवरे यांचा गौरव

# कोल्हापूरने राष्ट्रीय 'रोल मॉडेल' बनावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तथाकथित विकासाच्या गदारोळात मोठ्या-मोठ्या शहरांनी आपली ओळख हरविली आहे. मात्र, कोल्हापूरकरांनी आपल्या शहराची ओळख कायम राखली आहे. खरा भारत हा खेड्यांत आणि कोल्हापूरसारख्या शहरांमध्ये बसला आहे. त्यामुळे कोल्हापूर हे राष्ट्रीय स्तरावर एक रोल मॉडेल म्हणून पुढे यायला पाहिजे. अन्य शहरांनी विकासासाठी कोल्हापूरचे अनुकरण केले पाहिजे, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी गुरुवारी येथे केले. उत्साही वातावरणात शिवाजी विद्यापीठाचा ५६ व्या दीक्षान्त समारंभ उत्साहात पार पडला. त्यामध्ये यंदा सर्वाधिक ६० हजार स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या.

विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी होते. त्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीचे सन २०१९-२०२० चे राष्ट्रपती सुवर्णपदक कोल्हापूरच्या अभिषेक दादासाहेब श्रीराम याला आणि एम. ए. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कुलपती पदक हे सातारा येथील कीर्ती दत्तात्रय ननवरे हिला प्रदान करण्यात आले. (पान ८ वर)

## भूषण पटवर्धन म्हणाले

- यूजीसीकडून नॅशनल अकॅडेमिक क्रेडिट बँक, सेमिस्टर आउटरिच प्रोग्रॅमचे पाऊल.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात एक भारतकेंद्रित शिक्षणप्रणालीची कल्पना.
- शिक्षकांनी स्वत:ला आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून सादर करावे.
- शैक्षणिक परिसराचे रुपांतर बौद्धिक अथवा राजकीय कारणासाठी होऊ नये.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रेरित करावे. त्यांना राजकारण्यांच्या हातातील कठपुतळ्या बनण्यापासून रोखावे. / विशेष पान /८

## राष्ट्रपतिपदापर्यंतची संधी, प्रयत्न तर करा : राज्यपाल

हायस्कूलला जाईपर्यंत पायांत चप्पल नसलेली, स्वयंपाकही स्वत: करणारी माझ्यासारखी व्यक्ती राज्यपाल; तर चहा विकणारी व्यक्ती पंतप्रधान होते; ते केवळ शिक्षण, कष्ट आणि चांगल्या मार्गामुळे शक्य झाले. तुम्ही तर आता चहाही विकत नाही आणि विनाचप्पल चालत नाही. त्यामुळे तुम्हाला तर राष्ट्रपतिपदापर्यंतची संधी आहे. प्रयत्न करुन तरी बघा, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी विद्यार्थ्यांना केले.

आदित्य वेल्हाळ



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते कोल्हापुरातील अभिषेक दादासाहेब श्रीराम याला विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर सातारा येथील कीर्ती दत्तात्रय ननवरे हिला एम. ए. संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल कुलपती पदक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डावीकडून विलास नांदवडेकर, देवानंद शिंदे, भूषण पटवर्धन उपस्थित होते.

# कोल्हापूरने राष्ट्रीय स्तरावर 'रोल मॉडेल' बनावे : पटवर्धन

(पान १ वरून)

डॉ. पटवर्धन म्हणाले, कोल्हापूर हे शहर माझ्या दृष्टीने भारतातील रोल मॉडेल शहर आहे. मला या शहराबद्दल खूप प्रेम आहे. कोल्हापूर म्हटले की, अंबाबाई, कुस्ती, दूधदुभतं, रंकाळा आणि दिलदार माणसे आठवतात. ही कोल्हापूरची परंपरा असून येथील लोकांनी या शहराची ओळख दमदारपणे टिकवून ठेवली आहे. नवा भारत घडविण्यासाठी नव्या शिक्षणप्रणालीची, पद्धतीची गरज आहे. मॅकॉलिझमची 'कुलगुरू' नव्हे, तर गुरुकुल व्यवस्थेकडे पुन्हा जाण्याची, आणि सध्याच्या शैक्षणिक प्रणालीच्या पुनर्विचाराची आवश्यकता आहे. महात्मा गांधी यांची 'बुनियादी शिक्षण'प्रणाली घेऊन भविष्यातील शिक्षण दिले पाहिजे. शिक्षकांनी शिक्षण देणे ही आपली मक्तेदारी मानू नये. त्यांनी विद्यार्थिकेंद्रित शिक्षणाचा ध्यास घ्यावा. भविष्यातील शिक्षण हे नवीन रोजगार, नोकरीच्या संधी निर्माण करणारे असावे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी म्हणाले, आई, मातृभाषा, भारतमाता आणि प्रकृतिमाता (पर्यावरण) यांचा प्रत्येकाने आदर राखावा. विद्यार्थ्यांनी जीवनात उच्च ध्येय ठेवून ते साध्य करण्यासाठी जिद्द, कष्टांनी कार्यरत राहावे.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे दीक्षान्त मिरवणुकीने ज्ञानदंड घेऊन कार्यक्रमस्थळी आले. यावेळी जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे, अर्थतज्ज्ञ जे. एफ. पाटील, बी. पी. साबळे, डॉ. शिंपा शर्मा, आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अहवालवाचन केले. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. तृप्ती करेकट्टी, नंदिनी पाटील, सुस्मिता खुराळे, श्रद्धा निर्मळे, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

## शिवाजी विद्यापीठ शक्तिशाली केंद्र बनेल

दर्जेदार शिक्षण, संशोधन, विविध उपक्रम, कौशल्य यांचे संतुलन साधल्याने शिवाजी विद्यापीठाचा एक आश्वासक संस्था म्हणून उदय झाला आहे. सर्वसामान्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासह हे विद्यापीठ सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे एक शक्तिशाली केंद्र बनेल, असा विश्वास डॉ. पटवर्धन यांनी व्यक्त केला.

अमित गद्रे




**शिवाजी विद्यापीठाचा ५६ व्या दीक्षान्त समारंभ गुरुवारी झाला. या वेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते अभिषेक श्रीराम यास राष्ट्रपती सुवर्णपदक तर कीर्ती ननवरे हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. यावेळी डावीकडून डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, डॉ. देवानंद शिंदे, डॉ. भूषण पटवर्धन, डॉ. डी. टी. शिर्के आदी.**

# शिक्षणातूनच बेरोजगारीचे उच्चाटन

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे प्रतिपादन

'समर्पणवृत्तीने ध्येयपूर्ती करण्यासाठी परिश्रमाची तयारी आणि ज्ञान, संशोधनाचा समाजपरिवर्तनासाठी वापर झाला पाहिजे. चांगल्या शिक्षणामुळे बेकारी, बेरोजगारीचे उच्चाटन करता येईल. यासाठी शिक्षण प्रक्रियेत बदल करणे ही काळाची गरज आहे. सामाजिक भान देणारे शिक्षणच उपयुक्त आहे. विद्यापीठांनी तसे प्रयत्न केले पाहिजेत,' अशी अपेक्षा राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी येथे गुरूवारी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. कोश्यारी यांच्या हस्ते अभिषेक श्रीराम या विद्यार्थ्यास राष्ट्रपती सुवर्णपदक तर कीर्ती ननवरेला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, लेखाधिकारी व्ही. टी.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे आदींसह अधिष्ठाता, विद्यापरिषद व व्यवस्थापन मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

कोश्यारी म्हणाले, 'ध्येय, परिश्रम आणि समर्पण ही कोणत्याही क्षेत्रातील यशाची त्रिसूत्री आहे. उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी या दृष्टिकोनातून पाहायला हवे. या विचारातून समाज घडवणे विद्यापीठाचे कर्तव्य आहे. मातृभाषा, माता, मातृभूमी आणि निसर्ग यांचा कायम आदर केला पाहिजे. आज माणूस भौतिक सुखासाठी निसर्गावर अतिक्रमण करत आहे. त्यामुळे नैसर्गिक आपत्ती कोसळत आहेत. ते थांबवणे माणसाच्याच हातात आहे. शिक्षणाने अशा प्रकारचे सामाजिक भान येणार असेल तरच ते शिक्षण उपयुक्त आहे, असे म्हणता येईल. अस्वच्छतेच्या मुळाशी अनेक समस्या आहेत. आपण सामाजिक वर्तन कसे करतो हे प्रत्येकाने तपासून पाहिले पाहिजे. समाजात वावरताना तुमच्या पदवीपेक्षा तुम्ही शिक्षणाने कमावलेले ज्ञान महत्त्वाचे ठरते. हा विचार आचरणात आला तरच शिक्षणाचा अर्थ येईल.'

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा अहवालात घेतला. यंदा नॅक मूल्यांकनाला सामोरे जात असताना नोकरी, व्यवसाय क्षेत्रातील कुशल मनुष्यबळाची गरज पूर्ण करणारी शिक्षण प्रणाली हे विद्यापीठाचे वैशिष्ट्य आहे, असे ते म्हणाले.

### सार्वजनिक स्वच्छतेबाबत गांभीर्य हवे

कोल्हापूरविषयी खूप चांगले ऐकायला मिळते. येथील आदरातिथ्य, माणुसकी, हवामान या गोष्टींचे कौतुक होते. मात्र कोल्हापूर स्वच्छतेच्या बाबतीत खूपच मागे आहे. पायाभूत सुविधांची वानवा आहे. जेव्हा संपूर्ण कोल्हापूर स्वच्छतेत अव्वल होईल तेव्हाच मी कोल्हापूरची स्तुती करेन, अशा शब्दात कोश्यारी यांनी कोल्हापूरच्या अस्वच्छतेविषयी खंत व्यक्त केली. कोल्हापूरच्या उच्चशिक्षित युवकांनी स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्ती हे दोन संकल्प करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## शिक्षण पद्धतीच्या पुनर्विचाराची गरज



विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन म्हणाले, 'सध्याची शिक्षणपद्धती एका चाकोरीत अडकली आहे. केवळ गुणांच्या स्पर्धेत टिकणारे शिक्षण दिले जात आहे. अशा कालबाह्य शिक्षणव्यवस्थेमुळे सुशिक्षित बेरोजगारी वाढत आहे. ही चौकट भेदण्याची नितांत गरज आहे. सध्याची शिक्षणपद्धती ही शिक्षणसंस्था व शिक्षक यांना जे शिकवता येते तेच विद्यार्थ्यांनी शिकावे अशा प्रकारची एकांगी पद्धत आहे. शिक्षकांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार अभ्यास करा, नमुना उत्तराप्रमाणे उत्तर लिहा या चौकटीच विद्यार्थी शिकतो. त्याला कधीच विचारले जात नाही की तुला काय शिकायला आवडेल? त्यामुळे, शिक्षण म्हणजे संस्था व शिक्षक यांची मक्तेदारी झाली आहे. अशा प्रणालीतून बाहेर पडणारा विद्यार्थी केवळ मशीन बनत आहे. शिक्षणव्यवस्थेची ही शोकांतिका आहे.'

▸▸ सविस्तर वृत्त...कोल्हापूर टाइम्स १ व २

# पदवीधर झाल्याचा आनंद मोठा; विद्यार्थ्यांचे चेहरे फुलले

## सेल्फीसह गप्पा रंगल्या : बदललेल्या पोशाखाबाबत काहीशी नाराजी; खादीचा प्रसार करण्याचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सेल्फी आणि सामूहिक छायाचित्र घेत गुरुवारी दीक्षान्त समारंभात विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आनंद व्यक्त केला. पदवीधर झाल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर फुलला होता. गेल्यावर्षी समारंभाचे स्वरुप आणि यावर्षी दीक्षान्त पोशाख बदलला. त्याबाबत स्नातकांमधून नाराजी व्यक्त झाली. बदललेल्या स्वरुपानुसार केवळ विद्यापीठातील विविध अधिविभागांमधील स्नातकांना प्रत्यक्षात पदवी प्रदान केल्याने गर्दी कमी दिसून आली.

'यूजीसी'च्या सुचनेनुसार दीक्षान्त समारंभात खादीचा प्रसार करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यानुसार यंदा दीक्षान्त पोशाख (गाऊन) बदलला. विद्यापीठातील अधिकारी, अधिकार मंडळाचे सदस्य, पीएच. डी.धारक स्नातक आणि पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांनी खादीचा पांढरा कुर्ता, आकाशी वा लाल रंगाचे जॅकेट, तर महिला सदस्य, विद्यार्थिनींनी मोती रंगाची साडी परिधान केली होती. गळ्यात विद्यापीठाच्या नावाचा उल्लेख असलेला स्कार्फ घातला होता. समारंभ सुरु होण्यापूर्वी सकाळी आठ ते १० या वेळेत पदवीप्रमाणपत्रे वितरीत केली जात होती.

विद्यार्थी-विद्यार्थिनींना पदवी हातात मिळाल्यानंतर कुटुंबीय मित्र-मैत्रिणींसमवेत शिवपुतळा बगीच्यात छायाचित्रे काढून घेतली. काहींनी केवळ विद्यापीठाच्या नावाचा केशरी स्कार्फ गळ्यात घालून छायाचित्रे काढून घेतली. अधिकतर जण विद्यापीठ कॅम्पसमध्ये फिरून सेल्फी घेत आनंद व्यक्त करत होते. मुख्य समारंभ झाल्यानंतर अनेकजण ग्रंथमहोत्सवाकडे वळले. पुस्तकांच्या स्टॉलवर नजर टाकून त्यांनी खाद्यपदार्थांच्या स्टॉलबर गर्दी केली.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी ५६ व्या दीक्षान्त समारंभामध्ये पीएच. डी.धारक स्नातकांचे व्यासपीठावर केवळ प्रमुख उपस्थितांसमवेत एकत्रित छायाचित्र घेण्यात आले.

### 'पीएच. डी.'धारकांचे केवळ छायाचित्र

दरवर्षी पीएच. डी.धारक स्नातकांना प्रमुख उपस्थितांच्या हस्ते पदव्यांचे वितरण केले जाते; मात्र यंदा कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्याच्या नियोजनात त्याला कात्री लावली. त्यांना आधीच पदवी देऊन व्यासपीठावर प्रमुख उपस्थितांसमवेत छायाचित्र घेण्यात आले.

### आकडेवारी दृष्टिक्षेपात

- व्यासपीठावर प्रदान करण्यात आलेल्या पीएच. डी. : ४३
- अधिविभागातील पदवी घेतलेल्या स्नातकांची संख्या : २०६५
- पदवी प्रमाणपत्रे स्वीकारलेल्या महाविद्यालयांची संख्या : २९३
- ६०१६७ स्नातकांना पदव्या दिल्या.

"जुन्या दीक्षान्त पोशाखामुळे एक वेगळे वातावरण निर्माण व्हायचे. त्याचा एक वेगळा ग्लो असायचा. समारंभाचे स्वरुप बदलले असले, तरी विद्यापीठाने पूर्वीचा दीक्षान्त पोशाख ठेवला पाहिजे होता.

**- वीरभद्र रक्षे**, पदवीधर

"दीक्षान्त समारंभ म्हटले की, गर्दी व विशेष असणारा पोशाख आठवायचा; पण यावर्षी त्याची कमतरता जाणवली. या समारंभासाठी जुन्या पोशाखाचाही पर्याय ठेवावा.

**- प्रेरणा सरदार**, पदवीधर





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त सोहळ्यात उपस्थित राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, डॉ. भूषण पटवर्धन, कुलगुरू देवानंद शिंदे, प्र. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे व स्नातक राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता अभिषेक श्रीराम, कुलपती मेडल विजेती कीर्ती ननवरे. (सर्व छाया : पांडुरंग पाटील)

# आशा, आकांक्षेचे मोकळे आकाश

## शिवाजी विद्यापीठात दीक्षान्त सोहळ्यात तरुणाईचा उत्साह

कोल्हापूर / प्रतिनिधी :

**शिक्षण पूर्ण होऊन पदवी मिळाल्याचा चेहऱ्यावरून ओसंडून वाहणारा आनंद, जुन्या मित्र-मैत्रिणींची झालेली सुखकारक भेट आणि जीवनातील नव्या वळणावर जाताना डोळ्यात चमकणारी आशा-आकांक्षाची स्वप्ने, नव्या क्षितिजाला कवेत घेताना उत्साही, भावुकतेने शिवाजी विद्यापीठ प्रांगणातील स्नातकांत चैतन्य संचारले होते.**

शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित ५६ व्या दीक्षान्त सोहळ्यानिमित्त गुरुवारी पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा परिसर बहरून गेला होता. पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उत्साह, आनंदाचे भाव दिसत होते. नव्या जगाला सामोरे जाण्यासाठी 'हैं तयार हम', असा आत्मविश्वास प्रत्येकामध्ये दिसत होता. शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृह परिसरात सकाळपासूनच पदवीधर विद्यार्थी-विद्यार्थिनींची लगबग सुरू होती. मुख्य कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी जुन्या मित्र मैत्रिणींना भेटून आनंद व्यक्त केला जात होता. त्यामुळे परिसरात गप्पांचे फड रंगले होते.

विद्यापीठ प्रशासनाची मुख्य कार्यक्रमाच्या नियोजनाची लगबग सुरू होती. आकाशी जॅकेट, केशरी मफलरमधील पुरुष अधिकारी, तर मोती रंगाची साडी आणि त्यावर आकाशी जॅकेट परिधान केलेल्या महिला पदाधिकाऱ्यांकडून विभागवार कामाचे नियोजन केले जात होते. मुख्य कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी विद्यापीठ परिसरात पदवी घेण्यासाठी गर्दी केली होती. अनेकजण पारंपरिक वेशात, सुटाबुटात, तर कोणी साडीमध्ये आले होते. पाहुण्यांचे आगमन झाल्यावर सोहळ्याच्या मुख्य स्थळावर सारी गर्दी एकवटली.

मुख्य इमारतीपासून दीक्षान्त मिरवणूक विद्यापीठाच्या जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात आली. प्रभारी परीक्षा व मूल्यमापन संचालक गजानन पळसे यांच्यासह अधिकार मंडळातील सदस्य मिरवणुकीमध्ये सहभागी झाले होते.

### गुणवंतांचा सन्मान

इंग्रजी अधिविभागातील एम.ए.चा विद्यार्थी अभिषेक श्रीराम याला राष्ट्रपती सुवर्णपदकाने, तर एम.ए.मध्ये भाषा सामाजिकशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल छत्रपती शिवाजी महाविद्यालय सातारा येथील संस्कृत विभागाची विद्यार्थिनी कीर्ती ननवरे हिला कुलपती मेडलने सन्मानित करण्यात आले.



### विक्रमी पदवी प्रमाणपत्रांचे वितरण

पदवीदान सोहळ्यात ३५३ स्नातकांना पीएच.डी. पदवीने सन्मानित करण्यात आले, त्यापैकी ४३ स्नातकांना व्यासपीठावर पदवी बहाल करण्यात आली. एकूण ६० हजार १६७ पदवी स्नातकांना देण्यात आल्या. यातील २ हजार ६५ स्नातकांना प्रत्यक्ष पदवी देण्यात आली.



### सेल्फी आणि फोटो शेअरिंग

मित्र मैत्रिणींबरोबरचा क्षण फोटोत साठवून ठेवण्यासाठी प्रत्येकजण सेल्फी किंवा फोटो टिपत होते. ते फोटो लगेचच सोशल मीडियावर शेअर करत होता. तरुणांच्या या फोटोसेशनमुळे विद्यापीठ परिसरातील उद्यान आणि अन्य परिसराला सेल्फी पॉईंटचे रूप आले होते. तसेच पदवी मिळालेल्या वेळेची आठवण संग्रहित ठेवण्यासाठी मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ खास पदवीधारक ड्रेसकोडमध्ये फोटो टिपण्यात मग्न होते.

# चाकोरीबाहेरील शिक्षणाची गरज

## डॉ. भूषण पटवर्धन यांचे प्रतिपादन

कोल्हापूर / प्रतिनिधी :

सध्याची शिक्षण पद्धती एका विशिष्ट चाकोरीमध्ये अडकली आहे. ब्रिटिशांनी निर्माण केलेली ही पद्धती नाकारून नवीन शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले. ते दीक्षान्त सोहळ्यात प्रमुख पाहूणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्यपाल व कुलपती भगतसिंह कोश्यारी होते. विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात समारंभ झाला.

डॉ. भूषण पटवर्धन म्हणाले, ब्रिटिशांनी कारकून निर्माण करणारी शिक्षण पद्धती निर्माण केली. त्याच पद्धतीनुसार आजही शिक्षण देत आहोत. विद्यापीठ अनुदान आयोग ही पद्धती बदलण्यासाठी प्रयत्न करत आहे. सध्या शिक्षण ही शिक्षकांची मक्तेदारी राहिलेली नाही. विद्यार्थ्यांची क्षमता प्राध्यापकांनी समजून घेणे गरजेचे आहे. महाविद्यालये विद्यापीठांमधून शिकवले जाणारे शिक्षण म्हणजे शिक्षण नव्हे, तर बालपणातच घरातून शिक्षणाला सुरुवात होते. सध्याची कुलगुरू शिक्षण पद्धती आहे. त्याऐवजी गुरूकुल शिक्षण पद्धतीची गरज आहे.

विद्यापीठाचा वार्षिक अहवाल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सादर केला. उर्वरित वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी, ज्येष्ठ शास्त्रज्ञ शिवराम भोजे यांची उपस्थिती होती. पाहुण्यांचा परिचय प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी करून दिला, तर आभार कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी मानले.

### कोल्हापूर रोलमॉडेल

देशातील अन्य शहरे आपली ओळख गमवत असताना कोल्हापूरने आपली ओळख कायम ठेवली आहे. हे शहर राष्ट्रीय पातळीवर पुढे आले पाहिजे, असे डॉ. भूषण पटवर्धन म्हणाले. त्यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र आणि जय कोल्हापूर अशी घोषणा देत भाषणाचा समारोप केला.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. ०७-०२-२०२०

Times of India

# SUK gives out 60,167 degrees, most till date

TIMES NEWS NETWORK



Rahul Gayakwad

A student receiving her degree certificate from governor Bhagat Singh Koshyari

**Kolhapur**: The University Grants Commission (UGC) vice-chairman Bhushan Patwardhan on Thursday said that education campuses should not be used as war arena for intellectual and political reasons. He was addressing the 56th convocation ceremony of the Shivaji University, Kolhapur (SUK), on the varsity campus.

"We should inspire youths to take education more seriously and prevent them from becoming puppets of politicians. Teachers should present themselves as ideal personalities and should ensure that students abstain from any kind of violence. We should strive to protect our students from anti-social elements and use their energy for nation-building and enhancing creativity," Patwardhan said.

The varsity has conferred as many as 60,167 degrees this year, the highest number till date in SUK's history. Of the total degrees, 2,050 were conferred in presence while 35,668 will be conferred in respective colleges. Around 22,434 degrees will be conferred via postal mode.

Praising Prime Minister Narendra Modi in his speech, Patwardhan said that a five-year Education Quality Upgradation and Inclusion Project (EQUIP) action plan has been prepared. National Credit Bank and Semester Outreach Program (SOP) are some of the activities which have been initiated for the student-centric education system.

"To encourage research among students and teachers, Scheme for Transdisciplinary Research for India's Developing Economy (STRIDE) has been initiated. For research journals, Consortium for Academic and Research Ethics (CARE) has also been formed," he added.

State governor and chancellor Bhagat Singh Koshyari, in his address, said, "The world is witnessing the global climate change crisis and we need team efforts to avert the situation. For environment balance, we need a resolution for plastic-free society. The students should prioritize cleanliness and environment along with their academics."

Vice-chancellor of SUK Devanand Shinde, in his speech, said that the university has recently approved grant of Rs 1.1 crore under STRIDE. He said that as many as 2.5 lakh degree certificates have been uploaded online via the national academic depository initiative. He further said that under Rashtrya Uchchtar Shiksha Abhiyan, the varsity has received aid worth Rs 24 crore.

सर्व छाया : आदित्य वेल्हाळ






१) कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी मिळाल्यानंतर युवक-युवतींनी अशी एकत्रित उडी घेऊन आनंद व्यक्त केला. २) पदवी मिळाल्यानंतर एका स्नातकाने शिवपुतळा परिसरात छायाचित्र घेताना अशी पोझ दिली. ३) परीक्षा भवनसमोरील पदवी वितरण स्टॉलवर स्नातकांनी गर्दी केली होती. ४) पदवी मिळाल्यानंतर दोन पदवीधर महिलांनी असा 'सेल्फी' टिपला.

## भगतसिंह कोश्यारी : विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाला प्राधान्य द्यावे; उच्च ध्येय साध्य करण्यासाठी अभ्यासात सातत्य ठेवा

# कोल्हापूरला सर्वांत स्वच्छ, प्लास्टिकमुक्त शहर बनवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इतर वैशिष्ट्यांप्रमाणेच स्वच्छतेबाबतदेखील कोल्हापूरची स्तुती व्हावी. कोल्हापूरला राज्यातील सर्वांत स्वच्छ आणि सिंगल युज प्लास्टिकच्या वापरापासून मुक्त असलेले शहर बनवा. त्याबाबत कोल्हापूरने आघाडी घेतल्यानंतर मी सर्वत्र या शहराची स्तुती करीन. शिक्षणासह पर्यावरण रक्षण आणि स्वच्छतेला विद्यार्थ्यांनी प्राधान्य द्यावे, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६व्या दीक्षान्त समारंभामध्ये ते बोलत होते. राज्यपाल कोश्यारी म्हणाले, स्वच्छता असेल तर वातावरण निरोगी राहते आणि त्याचा उपयोग अभ्यास अथवा कोणतेही काम करताना चांगल्या पद्धतीने होतो. त्यामुळे प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासह पर्यावरण रक्षणावर भर द्यावा. माता, मातृभाषा, भारतमाता आणि तुळजाभवानी म्हणजेच प्रकृतीमाता (पर्यावरण) यांचा सन्मान राखा. जीवनात उच्च ध्येय बाळगून ते साध्य करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासामध्ये स्वयंशिस्त आणि सातत्य जोपासावे. प्रत्येक काम हे प्रामाणिकपणे आणि समर्पणाच्या भावनेतून केल्यास बेरोजगारीची समस्या भेडसावणार नाही. देशातील विविध योजनांचा लाभ घ्या. आदर्श नागरिक म्हणून देश, शहर, विद्यापीठ आणि स्वत:चे नाव उज्ज्वल करा. पदवीधरांनी शिक्षण, ज्ञान आणि संशोधनाचा उपयोग समाज परिवर्तनासाठी करावा. पर्यावरण रक्षण, समाजपरिवर्तनाचे भान देणाऱ्या शिक्षणाबाबतची प्रणाली अवलंबणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



कोल्हापुरात गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाच्या प्रारंभापूर्वी मिरवणूक काढण्यात आली. त्यात परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांच्यासह अधिकार मंडळांचे सदस्य सहभागी झाले होते.

### पुढील वर्षी मराठीत भाषण

◆ मातृभाषा जपणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा राज्यपाल म्हणून शपथ घेताना मी ती मराठीमध्ये घेतली. सध्या मी मराठी भाषा शिकत आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पुढील वर्षी होणाऱ्या दीक्षान्त समारंभात मराठीतून भाषण करीन, असे राज्यपाल कोश्यारी यांनी सांगितले.

### 'देवानंद' वाटतात!

◆ कुलगुरु यांचे नाव देवानंद असून, ते मला चित्रपटातील 'देवानंद' यांच्यासारखे वाटले. त्यांना घडविण्याचे श्रेय त्यांच्या ९४ वर्षीय आईचे आहे. त्या कुलगुरुंच्या चिरतारुण्याच्या प्रेरणा असल्याचे राज्यपाल कोश्यारी यांनी सांगितले.

## शाहू गौरव ग्रंथ देऊन राज्यपालांचे स्वागत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे गुरुवारी हेलिकॉप्टरने विमानतळावर आगमन झाले. यावेळी पालकमंत्री सतेज पाटील यांनी 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ' देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. सुहास बारके, जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अजय माने यांनी पुष्पगुच्छ देऊन राज्यपालांचे स्वागत केले. पोलीस दलातर्फे राज्यपालांना यावेळी मानवंदना देण्यात आली.



कोल्हापूर विमानतळावर गुरुवारी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे पालकमंत्री सतेज पाटील यांनी 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ' देऊन स्वागत केले. यावेळी आमदार चंद्रकांत पाटील व मान्यवर उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांना राजकारण्यांच्या कठपुतळ्या होण्यापासून रोखा

## डॉ. भूषण पटवर्धन : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यात शिक्षण क्षेत्राबाबत रोखठोक भाष्य

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : विद्यार्थ्यांना गंभीरपणे शिक्षण घेण्यास प्रेरित करत त्यांना राजकारण्यांच्या हातातील कठपुतळ्या बनण्यापासून रोखायला हवे, अशी अपेक्षा विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी आज येथे व्यक्त केली. नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट बँक योजनेद्वारे नैसर्गिक वातावरणातील शिक्षणाला महत्त्व दिले जाणार असून, सुटीच्या कालावधीत वेगळे स्किल आत्मसात करणाऱ्या विद्यार्थ्याला त्याचे क्रेडिट दिले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त सोहळ्यात ते बोलत होते. त्यांनी गांधीजींची बुनियादी शिक्षण पद्धत, ब्रिटिश कालखंडात गुरुकुल ते कुलगुरू पद्धतीचे संक्रमण, भविष्यकालीन शिक्षण यांचा वेध घेत उपस्थितांशी संवाद साधला. या वेळी राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागाचा विद्यार्थी अभिषेक श्रीराम याला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर साताऱ्याच्या शिवाजी महाविद्यालयातील कीर्ती ननवरे हिला कुलपती पदकाने सन्मानित केले. राजमाता जिजाऊ बहुदेशीय सभागृहात कार्यक्रम झाला.

पान ९ वर »



**दीक्षान्त सोहळ्यात बोलताना विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन.**





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त सोहळ्यात राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोशियारी यांच्याकडून राष्ट्रपती सुवर्णपदक स्वीकारताना अभिषेक श्रीराम व कुलपती पदक स्वीकारताना कीर्ती ननवरे. शेजारी डावीकडून वित्त व लेखाधिकारी विलास पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, यूजीसीचे उपाध्यक्ष भूषण पटवर्धन, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे.** **(बी.डी.चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)**

**“ कुलगुरू डॉ. शिंदे सिनेमातील देवानंदसारखे कसे दिसतात? असा प्रश्न मी त्यांना विचारला. त्यांनी समोर त्यांची ९४ वर्षांची आई बसल्याचे सांगितले. त्यामुळेच ते चिरतरुण असल्याचे लक्षात आले.'' डॉ. पटवर्धन यांच्या भाषणाचा परामर्श घेताना कोश्यारी यांनी, कोल्हापूर महाराष्ट्रातील सर्वात स्वच्छ व प्लास्टिकमुक्त शहर होईल, त्यावेळी मी कोल्हापूरकरांचे अभिनंदन करण्यासाठी पुन्हा येईन.**

**- भगतसिंह कोश्यारी, राज्यपाल**

# विद्यार्थ्यांना राजकारण्यांच्या कठपुतळ्या होण्यापासून रोखा

» पान १ वरून

डॉ. पटवर्धन म्हणाले, ''गुणवत्तावाढीसाठी यूजीसीचे दहा विभाग आहेत. विद्यार्थीकेंद्रित शिक्षण त्याचा प्रमुख हेतू आहे. शिक्षकांनी शिक्षण ही मक्तेदारी केली आहे. आई, गुरू, समाज यांचा आदर व्हायला हवा. शहरी भागातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शहरात येऊन तेथील परिस्थितीचा अभ्यास करायला हवा.''

ते म्हणाले, ''नॅशनल ॲकॅडमिक क्रेडिट बँक योजनेद्वारे पाच वर्षांचा अभ्यासक्रम तीन वर्षांत अथवा तीन वर्षांचा अभ्यासक्रम दोन वर्षांत पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला क्रेडिट देऊन महत्त्व दिले जाईल. '' कुलगुरू पद्धती पद व प्रतिष्ठेला अधिक केंद्रित करणारी असून, पारंपरिक शिक्षण पद्धतीत पूर्वकालीन शिस्त व वैज्ञानिक शोधभावना यांचा अभाव जाणवत आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्री. कोश्यारी म्हणाले, ''आई, मातृभाषा, मातृभूमी व प्रकृतीमातेचे रक्षण कराल तर निश्चित ध्येयापर्यंत पोचाल. मी शालेय विद्यार्थी असताना माझ्या पायात चप्पल नव्हते. ज्यांनी चहा विकला ते पुढे देशाचे पंतप्रधान झालेत. तुम्ही तर शिक्षित आहात. तुमच्याकडे खूप पर्याय आहेत. तुमच्याकडे समर्पण वृत्ती असणे आवश्यक आहे.''

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, ''माझ्या कारकीर्दीतला हा अखेरचा दीक्षान्त सोहळा आहे. साडेचार वर्षांचा कालावधी बघता बघता लोटला. जैवरसायनशास्त्र अधिविभागात मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट हा एम.एस्सी.चा पहिला आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावे राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येणार असून, पुरस्काराची घोषणा लवकरच करण्यात येईल.''

या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी विलास पाटील, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, आयुक्त मल्लिनाथ कलशेट्टी उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

## डॉ. पटवर्धन म्हणाले...

- शिवाजी विद्यापीठाचा वारसा भारतीय शिक्षण प्रणालीच्या परिवर्तनाच्या टप्प्यात महत्त्वपूर्ण
- सीएआरईद्वारे भारतीय उच्च शिक्षण प्रणालीतील शैक्षणिक, संशोधन, तांत्रिक व नियामक वातावरण सुधारण्यास मदत
- भविष्यकालीन शिक्षण औद्योगिक, आर्थिक विकासास साह्य करणारे असावे
- शिक्षण पद्धती माहितीचा किंवा ज्ञानाचा साठा असणारे अभ्यासक निर्माण करणारी नसावी
- गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण केवळ श्रीमंत व सामर्थ्यवान मुलांसाठी उपलब्ध नको
- शैक्षणिक परिसराचे रूपांतर बौद्धिक व राजकीय कारणासाठी वापरल्या जाणाऱ्या युद्धक्षेत्रात होऊ नये

## जय महाराष्ट्र, जय कोल्हापूर...!

कोल्हापूर हे साऱ्या शहरांसाठी रोल मॉडेल आहे. अंबाबाई, कुस्ती, दूधकट्टा, रंकाळा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे इथला दिलदार माणूस ही या शहराची ताकद आहे. विकासाच्या गदारोळातील कोल्हापूरची अस्सल ओळख इतर शहरांसाठी नक्कीच अनुकरणीय आहे, असे गौरवोद्‌गार प्रा. डॉ. पटवर्धन यांनी काढले. त्यांनी आपल्या भाषणाची सांगता 'जय हिंद, जय महाराष्ट्र आणि जय कोल्हापूर' अशीच केली.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त सोहळा गुरुवारी झाला. यानिमित्ताने सकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात ग्रंथदिंडी निघाली. त्यानंतर राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात मुख्य दीक्षान्त सोहळा सजला. या सोहळ्याची ही चित्रमय झलक.

(सर्व छायाचित्रे : बी. डी. चेचर, मोहन मेस्त्री)



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते दिंडीला सुरवात झाली. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. अभय जायभाये, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. डी. आर. मोरे.



कोल्हापूर : पदवी स्वीकारल्यानंतर छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यासमोर असे फोटोसेशन रंगले.



कोल्हापूर : ग्रंथदिंडीत सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.



पदवी प्रमाणपत्र मिळाल्यानंतरचा आनंद.



खादीच्या प्रचारार्थ खादीचा पेहराव करण्याचे आवाहन करण्यात आले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.



ग्रंथ महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



कोल्हापूर : पदवी मिळणे म्हणजे आयुष्यातील महत्त्वाचा क्षण. मित्र-मैत्रिणींबरोबर मग तो असा अविस्मरणीय बनवला गेला.



व्ही. टी. पाटील सभागृहापासून ते विद्यापीठादरम्यान ग्रंथदिंडी निघाली.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी. सोबत डॉ. भूषण पटवर्धन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अन्य मान्यवर. (छाया : पांडुरंग पाटील)

# विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय जोपासावे

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी | शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

**जीवनात अनुशासन आणि समर्पण असल्यास यश निश्चित मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासात स्वयंशिस्त आणि सातत्य ठेवून उच्च ध्येय जोपासावे, असे आवाहन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले. ते शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभात अध्यक्षीय भाषणात बोलत होते. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन होते. या वर्षीच्या दीक्षांत समारंभांतर्गत ६० हजार १६७ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.**

> आपल्या जीवनात माता, मातृभाषा, भारतमाता आणि प्रकृतीमाता महत्त्वाच्या आहेत. त्यामुळे आपण नेहमी मातृभाषा बोलली पाहिजे. मराठी येत नसतानाही राज्यपाल झाल्यानंतर मराठीत शपथ घेतली. गेल्या ७० वर्षांत पहिल्यांदा राज्यपालाने मराठीत शपथ घेतली आहे. सध्या मराठी व्यवस्थित बोलता येत नसले तरी वाचता येते. पुढच्या दीक्षांत समारंभात मराठीत बोलता येईल, अशी प्रार्थना आपण करावी. **– राज्यपाल भगतसिंह कोश्यारी**

राज्यपाल कोश्यारी म्हणाले, आपण जे काम हाती घेता तसेच करता ते समर्पणाच्या भावनेतून प्रामाणिक हेतूने करावे. त्यासाठी इच्छाशक्ती आणि दृढ संकल्प जोपासून आपले ध्येय साध्य करणे गरजेचे आहे. सध्या जगासमोर आज जागतिक तापमानवाढीचे संकट उभे असून या संकटाला सामूहिक प्रयत्नातून रोखणे काळाची गरज बनली आहे.

आज पर्यावरण संतुलन सर्वार्थाने महत्त्वाचे आहे. यासाठी स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्तीचा संकल्प सर्वांनी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच स्वच्छता आणि पर्यावरणाला प्राधान्य देऊन आपला समाज आणि आपला परिसर स्वच्छ, सुंदर, आरोग्यसंपन्न बनविण्यात योगदान द्यावे. प्रत्येकाने जीवनात आईचा आदर करण्याबरोबरच ▶▶ पान ७ वर

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. ०७-०२-२०२०

तरुण भारत

# ग्रंथदिंडीच्या माध्यमातून वाचन संस्कृतीला चालना

## शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथ दिंडी : टाळ मृदुंग, ढोल ताशांमुळे चैतन्य : पथनाट्याच्या माध्यमातून सामाजिक संदेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

वाचन संस्कृतीचा संदेश देणारे फलक हातात घेऊन गांधी टोपी घातलेल्या युवकांनी ग्रंथदिंडीच्या माध्यमातून प्रबोधनाचा जागर केला. विविध महाविद्यालयातील विद्यार्थी आणि अधिकारी ग्रंथदिंडीत सहभागी झाले होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील मुलांनी सादर केलेली पथनाट्य घोषणाबाजी ग्रंथदिंडीचे मुख आकर्षण ठरले. 'जय शिवराय जय जिजाऊ' अशा घोषणा देत ग्रंथदिंडी पुढे सरकत होती.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या हस्ते कमला कॉलेजमधून ग्रंथदिंडीला सुरुवात झाली. राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर चौक दूरशिक्षण केंद्रामार्गे दीक्षांत सोहळा होणाऱ्या राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात दिंडीची सांगता झाली. फुलांनी सजवलेल्या पालखीत ग्रंथाची आरास मांडण्यात आली होती. काही विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा केली होती. कॉमर्स कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी 'मुलीच्या जन्माचे स्वागत' या विषयावर पथनाट्य सादर केले. विद्यार्थीनींनी पारंपरिक पध्दतीने नऊवारी साडी परिधान केली होती. विद्यार्थिनींनी फुगडी घालून आनंद साजरा केला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथ दिंडी घेऊन जाताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सोबत डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. नमिता खोत, डॉ. डी. आर. मोरे आदी.

ग्रंथदिंडीत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रप्रमुख डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. डी. राऊत, व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी, डॉ. आर. जी. कोरबू, डॉ. एस. आर. लिहितकर, डॉ. एस. बी. पाटील आदी सहभागी झाले होते.

शिवाजी विद्यापीठातील ग्रंथोत्सवामध्ये कौशल्य विकास सेलच्या विद्यार्थ्यांनी खाद्यपदार्थांसह विविध स्टॉल मांडले आहेत. देश व विदेशातील प्रकाशकांनी ग्रंथांचे स्टॉल लावले होते. अनेक प्राध्यापक, वाचकांनी बुकस्टॉलला भेट देऊन पुस्तक खरेदी केली. छत्रपती राजर्षी शाहू महाविद्यालयातील झांजपथकाने ग्रंथदिंडीला ढोल ताशांच्या गजरात शोभा आणली. शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिकार मंडळाच्या सदस्यांनी ग्रंथ दिंडीत सहभागी झाले होते. ग्रंथोत्सव पहावयास आलेल्या विद्यार्थ्यांनी पोटपूजा करण्यासाठी खाद्यपदार्थांच्या स्टॉलवर गर्दी केली होती.

### खादीचा प्रसार आणि प्रचार

विद्यापीठ अनुदान आयोगायच्या मार्गदर्शक तत्वानुसार यंदा शिवाजी विद्यापीठाने दीक्षांत समारंभामध्ये खादीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे नियोजन केले होते. विविध अधिकार मंडळाच्या सदस्यांना ड्रेसकोड होता. पुरुषांसाठी मोरपंखी रंगाचे जॅकेट, पांढरा सलवार कमीज, केशरी मानवस्त्र तर महिलांसाठी मोती रंगाची साडी व मोरपंखी जॅकेट, केशरी मानवस्त्र असा ड्रेसकोड विविध अधिकार मंडळाच्या सदस्यांनी परिधान केला होता.

### डी. लिट. पदवी प्रदान मान्यवरांचे फोटो

राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहाबाहेर उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वतीने डी. लिट. पदवी देऊन गौरविलेल्या मान्यवरांचे डिजीटल फलक उभे केले होते. यामध्ये वि. स. खांडेकर, व्हि. व्ही. गीरी, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, डॉ. दिलीप संगवे, क्रांतिवीर नागनाथ नायकवडी, माधवराव बागल, जी. डी. बापू व्ही. टी. पाटील, डॉ. वसंत गोवारीकर, यशवंतराव चव्हाण, शंकरराव थोरात, चंद्रकांत मांढरे, डॉ. डी. वाय. पाटील यांच्यासह मान्यवरांचे फोटो लावण्यात आले होते.



कोल्हापूर : विद्यार्थी व विद्यार्थीनींनी पदवी प्राप्तीचा आनंद उडी मारून साजरा केला. (छाया : इम्रान गवंडी)

### विद्यार्थी नाराज

गतवर्षीपासून महाविद्यालयाचा दीक्षांत सोहळा त्या त्या महाविद्यालयात घेण्याचा निर्णय घेतल्याने विद्यापीठात फक्त दोन हजार विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिल्याने गर्दी फारच कमी होती. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर फोटो काढण्यासाठी दरवर्षीसारखा उत्साह दिसून आला नाही. दीक्षांत समारंभाचे वातावरण नसल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांमधून येत होती.

### फलकांच्या माध्यमातून वाचन संस्कृतीचा प्रसार

'स्वच्छ उर्जा वापरण्याची एकमेव दिशा, हरित वसुंधरेची फुलेल नवी आशा', 'ज्याला उत्तम ग्रंथ वाचण्याचा छंद असतो, तो जगात कुठेही सुखी राहू शकतो', 'माणसाची चौथी मूलभूत गरज म्हणजे पुस्तक', 'वाचाल तर वाचाल', 'ज्ञान म्हणजे आत्मतत्वांचा बोध होणे होय', 'पुस्तके म्हणजे तुमचे मन निर्मळ करणारा साबण आहे. 'वाचनासाठी वेळ काढा तो शहाणपणाचा निर्झर आहे.' 'वाचन बुध्दीचे खाद्य आहे', अशा प्रकारचे फलक तयार करून विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीविषयी ग्रंथदिंडीमध्ये जागृतीही केली.



### तब्बल ५५ वर्षानंतर दीक्षांतसाठी गाऊनची पद्धत बंद

विद्यापीठाचा दीक्षांत सोहळा प्रत्येक पदवीधरांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण. पदवीधर विद्यार्थी भगवा गाऊन घालून विद्यापीठभर फिरायचे. या क्षणाचे साक्षीदार गेल्या ५५ वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा व विद्यापीठाची मुख्य इमारत आहेत. गाऊनची पद्धत बंद केल्याने यंदा पहिल्यांदाच केशरी मानवस्त्र घालून फोटो पदवी प्रमाणपत्र घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना काहीच उत्साह वाटला नसल्याच्या प्रतिक्रिया विद्यार्थ्यांमधून उमटत होत्या. पीएच. डी. स्नातकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदवी घेण्याचा आनंद घेता आला नाही. तर पदवी प्रमाणपत्र घेऊन पाहुण्यांबरोबर पाचच्या ग्रुपने उभे राहून फोटो काढण्याची पद्धत यंदा सुरू करण्यात आली आहे.

### विद्यापीठाला पोलीस छावणीचे स्वरुप

दीक्षांत समारंभास राज्यपाल भगतसिंह कोश्यारी हे उपस्थित राहणार असल्यामुळे बुधवारपासून शिवाजी विद्यापीठ परिसराला पोलीस छावणीचे स्वरुप प्राप्त झाले होते. राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहाकडे जाणारे सर्व रस्ते बॅरीकेट लावून बंदीस्त करण्यात आले होते. सभागृहाच्या बाहेर मेटल डिटेक्टर लावले होते. १ पोलीस उपअधीक्षक, ६ पोलीस निरीक्षक यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

### दूरशिक्षण विभागात महाविद्यालयांना पदवी प्रमाणपत्र देण्याची सोय

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील २९३ महाविद्यालयांसाठी पदवी प्रमाणपत्र वितरण व्यवस्था दूरशिक्षण विभागात केली होती. त्यामुळे सकाळपासून महाविद्यालय प्राध्यापकांनी पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी दूरशिक्षण विभागात गर्दी केली होती.

# यशस्वी होण्यासाठी उच्च ध्येय ठेवा : राज्यपाल कोश्यारी

## शिवाजी विद्यापीठ पदवीदान सोहळा उत्साहात; शिक्षण पद्धतीचा पुनर्विचार आवश्यक : डॉ. पटवर्धन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मेहनत, कष्ट, त्याग, इच्छाशक्ती आणि दृढ संकल्प जोपासावा. विद्यार्थ्यांनी अभ्यासात स्वयंशिस्त व सातत्य ठेवले पाहिजे. हाती घेतलेले काम समर्पणाच्या भावनेतून प्रामाणिक हेतूने करावे. योजनांचा लाभ घ्या, यशस्वी होऊन समाजाचे, देशाचे नाव उज्ज्वल करा, असे आवाहन राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांनी केले. यावेळी शिक्षण पद्धतीचा पुनर्विचार करण्याची गरज प्रमुख पाहुणे व विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ गुरुवारी झाला. यावेळी अध्यक्षस्थानावरून राज्यपाल कोश्यारी बोलत होते. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. शिवराम भोजे, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी.पाटील, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू बी. पी. साबळे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी अजय माने प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशील सभागृहात हा दिमाखदार सोहळा झाला.

**शिक्षणासह पर्यावरणाला विद्यार्थ्यांनी महत्त्व द्यावे**

राज्यपाल कोश्यारी म्हणाले, जगासमोर आज जागतिक तापमानवाढीचे संकट उभे असून या संकटाला सामूहिक प्रयत्नातून रोखणे काळाची गरज बनली आहे. आज पर्यावरण संतुलन सर्वार्थाने महत्त्वाचे आहे. यासाठी स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्तीचा संकल्प सर्वांनी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच स्वच्छता आणि पर्यावरणाला प्राधान्य देऊन आपला समाज आणि आपला परिसर स्वच्छ, सुंदर, आरोग्य संपन्न बनविण्यासाठी तसेच पर्यावरणाचे रक्षण करत जागतिक तापमान वाढीचे संकट रोखण्यासाठी विद्यार्थ्यांनी सक्रिय योगदान द्यावे.

प्रत्येकाने जीवनात आईचा आदर करण्याबरोबरच भारतमातेचाही आदर करावा, असे आवाहन करून राज्यपाल कोश्यारी म्हणाले, आई, मातृभाषा, पर्यावरण आणि भारतमाता या चार मातांना मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येकाने या मातांचा आपल्या जीवनात आदर करणे महत्त्वाचे आहे. आज मातृभूमी सुरक्षित आहे. मात्र, आपली मातृभाषा धोक्यात आहे. यामुळे मातृभाषेचा सन्मान करा, त्याचा अभ्यास करा.

**विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखा : पटवर्धन**

काही नामांकित विद्यापीठांची सद्यः स्थिती चिंताजनक आहे, असे सांगत डॉ. पटवर्धन म्हणाले, विद्यार्थ्यांच्या क्षमता ओळखल्या पाहिजेत. त्यांना काय आवडते, त्यांच्या काय मर्यादा आहेत, त्यांना काय अपेक्षित आहे, हे पाहिले पाहिजे. त्यांना शिक्षणात सामावून घेतले पाहिजे. त्यांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, स्थानिक संस्कृतीची ओळख मिटावी यासाठी ब्रिटिश कालखंडात काही विद्यापीठे सुरू झाली. याच कालखंडात गुरुकुल ते कुलगुरू असे संक्रमण झाली. क्लर्क फॅक्टरी तयार करणारी शिक्षण व्यवस्था बंद झाली पाहिजे. त्याऐवजी नव्या तंत्रज्ञानाची जोड देऊन गुरुकुल शिक्षण पद्धती आणली तर विद्यार्थ्यांची सुप्त क्षमता आणि व्यक्तिमत्त्व विकासाला निश्चितपणे प्रेरणा मिळेल.

**नवी शिक्षण पद्धती**

विद्यापीठ अनुदान आयोग नवी शिक्षण पद्धती आणत आहे, असे सांगत डॉ. पटवर्धन म्हणाले, मानव संसाधन विकास मंत्रालयाने डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (नॅशनल एज्युकेशन पॉलिसी) तयार करण्यासाठी समिती नेमली आहे. त्यांनी सुचवलेल्या शिफारशींनुसार विद्यापीठ अनुदान आयोग नॅशनल अ‍ॅकॅडेमिक क्रेडिट बँक (नॅक बँक) आणि सेमिस्टर आऊटरी प्रोग्राम (एसओपी) राबविण्याचा विचार करत आहे. ज्या विद्यार्थ्याला पदवी मिळवताना, त्याला त्याच्या कलागुणांचे क्रेडिट दिले जाईल, ते या बँकेत जमा होईल, त्याचे गुण पूर्ण झाले तर एकादा विद्यार्थी तीन वर्षांची पदवी दोन वर्षांतही घेऊ शकेल. तसेच अभ्यासक्रमाचे एक सेमिस्टर बाहेर घालवावे लागेल. शहरी भागातील विद्यार्थी यामुळे ग्रामीण भागात जातील; तर ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी भागात येतील. या नव्या पद्धतीवर विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी भर दिला तर महात्मा गांधी यांना अपेक्षित असणारा ग्रामीण भारत निर्माण होईल.

विद्यापीठाच्या जैवविविधता व सर्वसमावेशक उल्लेखनीय धोरणांचा तसेच विद्यापीठास मिळालेल्या 'अ' मूल्यांकनाबाबत गौरव करून डॉ. पटवर्धन म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने ५६ वर्षांचा वारसा जपत भारतीय शिक्षण प्रणालीच्या परिवर्तनाच्य टप्प्यात महत्त्वाची भूमिका बजावली भारतीय शैक्षणिक प्रणालीचा पुनर्विचा करण्याची गरज आहे. गौरवशाली भूतकाळाचे धडे आपणास उज्ज्वल भविष्याच्या दिशेने जाण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरतील. शिवाजी विद्यापीठ सर्वसामान्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावत राहील, अशी ग्वाही देत हे विद्यापीठ सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे एक शक्तिशाली केंद्र बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, विद्यापीठाने स्थापनेपासूनच सामाजिक बांधीलकीची जाणीव बाळगली आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या उच्च शैक्षणिक उत्थानासाठी मोलाचे योगदान दिले आहे. संशोधनाच्या क्षेत्रात विद्यापीठाने राष्ट्रीय स्तरावर प्रभुत्व सिद्ध केले आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी संशोधन धोरण निर्मिती केली आहे.

विद्यापीठाने सर्व घटकांच्या सहकार्याने पंचवार्षिक बृहत आराखडा तयार केला असून त्याच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली आहे. नवे जग वेगवान आणि स्पर्धेचे असून स्पर्धा जागतिक स्तरावरची आहे. त्यासाठी पदवीबरोबरच जीवनकौशल्ये व तंत्रकौशल्ये आत्मसात करावी लागणार आहेत. अंगभूत कौशल्ये, आत्मविश्वास व सर्जनशीलतेच्या बळावर जगभर विद्यापीठाचे विद्यार्थी प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. विद्यापीठाच्या लौकिकात मोलाची भर घालण्याचे काम नवपदवीधर विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी प्रदान करण्यात येणाऱ्या पदव्यांची माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी करून दिला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

### कोल्हापूर म्हणजे 'पुढारी'

मूळचे पुण्याचे असलेले डॉ. पटवर्धन यांनी आपल्या भाषणात कोल्हापूरचा गौरव केला. कोल्हापूर म्हटले की अंबाबाई आठवते. कुस्ती, दूध, रंकाळा आठवतो. येथील दिलदार माणसे आठवतात आणि इथला 'पुढारी'सुद्धा आठवतो. कोल्हापूर म्हणजे 'पुढारी' ही या शहराची ओळख आहे, असे सांगत शहराची ताकद काय असते, हे कोल्हापूरने दाखवून दिले आहे. राष्ट्रीय स्तरावर कोल्हापूर रोल मॉडेल म्हणून पुढे यायला पाहिजे, असे सांगत डॉ. पटवर्धन यांनी 'जय हिंद, जय महाराष्ट्र आणि जय कोल्हापूर' अशी आपल्या भाषणाची सांगता केली.

### अभिषेक श्रीराम, कीर्ती ननवरे यांचा सन्मान

दीक्षान्त समारंभात राष्ट्रपती सुवर्णपदक शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागातील अभिषेक श्रीराम व कुलपती मेडल साताऱ्यातील छत्रपती शिवाजी कॉलेजची कीर्ती ननवरे हिला प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर विविध विषयांमध्ये पीएच.डी. प्राप्त करणाऱ्या ४३ स्नातकांना व्यासपीठावर पीएच.डी. पदवी प्रमाणपत्र व इतर १६ पारितोषिके देण्यात आली.

### मिरवणूक मार्गावर डॉ. ग. गो. जाधव यांचे छायाचित्र

शिवाजी विद्यापीठाने डी. लिट. पदवी देऊन गौरविण्यात आलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींची छायाचित्रे दीक्षान्त मिरवणूक मार्गावर लावली होती. यामध्ये दैनिक 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री डॉ. कै. ग. गो. जाधव यांचे छायाचित्र होते. त्या खाली त्यांच्या कार्याची माहितीही देण्यात आली होती. या निमित्ताने या थोर विभूतींच्या कार्याचे स्मरण होत होते.

### कोल्हापूर स्वच्छ आणि प्लास्टिकमुक्त शहर बनवा

डॉ. पटवर्धन यांनी आपल्या भाषणात कोल्हापूरचा उल्लेख केला, त्याचा संदर्भ देत राज्यपाल कोश्यारी म्हणाले, कोल्हापूरचे गुणगान मी ऐकले. पण, कोल्हापूरला तुम्ही राज्यातील सर्वात स्वच्छ आणि प्लास्टिकमुक्त शहर बनवा, इतिहास घडवा. या शहराचे गुणगान करण्यासाठी मी परत येईन, असे सांगताच त्यांच्या आवाहनाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभात अध्यक्षस्थानावरून बोलताना राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी. व्यासपीठावर उपस्थित डावीकडून वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. भूषण पटवर्धन, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे. (छाया : पप्पू अत्तार)

### महापुरात कोल्हापूरकरांना विद्यापीठाची साथ

जिल्ह्यात महापुराने मोठी हानी झाली. विद्यापीठाने एका रात्रीत आपत्ती व्यवस्थापन व मदत-पुनर्वसन केंद्र कार्यान्वित करून आपद्ग्रस्तांसाठी भोजन, निवारा व आरोग्य सेवेची उपलब्धता केली. शहराला पाणीपुरवठा करणारी सर्व जलशुद्धीकरण केंद्रे पाण्याखाली असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. विद्यापीठाच्या जलशुद्धीकरण केंद्रातून दररोज सुमारे २५ लाख लिटर पाणीपुरवठा केला. महापुरात विद्यापीठाने कोल्हापूरकरांना साथ दिल्याचे कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# वाचन संस्कृती, प्रबोधनाचा जागर

## दीक्षान्त समारंभानिमित्त ग्रंथदिंडी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

**स्त्रीभ्रूण हत्या रोखा...बेटी बचाओ, बेटी पढाओ...ग्रंथ हेच गुरू अशा घोषणांसह झांजपथक, ढोल-ताशा या पारंपरिक वाद्यांचा गजर करत विद्यापीठातील विद्यार्थी व विविध महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थ्यांनी समाजप्रबोधन आणि वाचन संस्कृती जोपासण्याचा संदेश दिला.**

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने ग्रंथदिंडीचे गुरुवारी आयोजन करण्यात आले होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचे पूजन करून सकाळी ८ वाजता कमला कॉलेजच्या प्रांगणात उद्‌घाटन झाले. फुलांनी सजविलेल्या पालखीत ग्रंथ ठेवण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी वेशभूषा केली होती. विद्यार्थिनींनी पारंपरिक आणि विद्यार्थ्यांनी परिधान केलेले खादीचे पोशाख लक्ष वेधून घेत होते. ग्रंथदिंडीत सामाजिक संदेश देणारे फलक अग्रभागी होते. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय,' 'वाचाल तर वाचाल,' तसेच भद्रकाली ताराराणी यांचा जयघोष अशा उत्साही वातावरणात शहरातील मुख्य रस्त्यांवरून ग्रंथदिंडी मार्गस्थ होत होती. विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या डोक्यांवरील 'गांधी टोप्या' हे ग्रंथदिंडीचे आकर्षण होते. कमला कॉलेज, जनता बझार चौक, राजारामपुरी मेन रोड, आईचा पुतळा, सायबर चौक मार्गे शिवाजी विद्यापीठात ग्रंथदिंडीची सांगता झाली.

विद्यापीठातील मुख्य इमारतीसमोर दिंडी आल्यानंतर महिला कर्मचारी आणि विद्यार्थिनींनी ग्रंथदिंडी खांद्यांवर घेतली. त्यानंतर लोककला केंद्रात ग्रंथदिंडीतील पालखी ठेवण्यात आली. दिंडीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. डी. आर. मोरे, न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. पाटील, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. शिवराज थोरात, डॉ. सचिन पाटील, डॉ. युवराज जाधव यांच्यासह एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी सहभागी झाले होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत खांद्यांवरून पालखी नेत असताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. नमिता खोत.**
**(छाया : पप्पू अत्तार)**

### पारंपरिक वाद्यांवर धरला ठेका...

दीक्षान्त समारंभानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीत एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विद्यार्थी यांच्यासह मान्यवरांनी टाळ-मृदंग या पारंपरिक वाद्यांवर ठेका धरला. यामुळे वातावरण चैतन्यमयी बनले होते.

## यार, मस्त होते ना ते दिवस..!

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चार-पाच वर्षे विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये अभ्यासाबरोबरच केलेला कल्ला... परीक्षेचा तणाव अन् गॅदरिंगची धम्माल मस्ती... मित्र-मैत्रिणींकडून मिळणारे पाठबळ आणि शिक्षकांकडून लाभलेले मार्गदर्शन, अशा आठवणींना पुन्हा एकदा उजाळा मिळाला. निमित्त होते शिवाजी विद्यापीठात आयोजित कॉन्व्होकेशन अर्थात दीक्षान्त समारंभाचे. शिक्षण आणि परीक्षेनंतर केवळ फेसबुक आणि व्हॉट्स ॲपवर भेटणारे मित्र आज दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने पुन्हा एकदा प्रत्यक्ष भेटले आणि जुन्या आठवणी ताज्या झाल्या. सध्या जॉब किंवा बिझनेसमुळे सुरू असणारी दगदग अन् ताणतणावामुळे प्रत्येक जण 'यार, मस्त होते ना ते दिवस,' असेच म्हणत होता.

शिवाजी विद्यापीठ कॅम्पस सकाळपासूनच गर्दीने फुलून गेला होता. विविध विद्याशाखांच्या पदव्या घेण्यासाठी परीक्षा भवन परिसरात स्टॉल लावले होते. दीक्षान्त समारंभानिमित्त मुख्य इमारतीपासून ते मुख्य कार्यक्रमाच्या स्थळापर्यंत आकर्षक भव्य मंडप उभारण्यात आला होता. मंडपात जुन्या पदवीधर विद्यार्थ्यांची लावलेली कटआऊट सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. मुख्य कार्यक्रमाच्या प्रवेशद्वाराजवळ व्यवस्थापनाचे अधिकारी व कर्मचारी ड्रेसकोडमध्ये पाहुण्यांचे स्वागत करीत होते.

**पान २ वर ▸**




**कोल्हापूर : पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी असा जल्लोष केला.**

# यार, मस्त होते ना ते दिवस..!

**(पान १ वरून)** आकाशी रंगाचा जॅकेट, केशरी मफरल आणि पांढरा सलवार असा गणवेश त्यांनी केला होता. पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्यासाठी स्थानिक तसेच बाहेरगावाहून विद्यार्थी केएमटी, रिक्षा व खासगी वाहनांमधून कार्यक्रमस्थळी येत होते. काहीजण मित्र-मैत्रिणींसोबत तर काही विद्यार्थी आई-वडील व नातेवाईकांसोबत आले होते. आठ वाजल्यापासूनच

> संगणकशास्त्र विभागाची पदवी घेतल्याचा मनस्वी आनंद आहे. कष्ट व परिश्रमाचे फळ मिळाले आहे. येथून पुढे जीवनाची वाटचाल सुरू झाली असून नवीन आव्हाने सामोरे जाण्याचा प्रयत्न असेल.
>
> **- प्रताप भोईटे,** विद्यार्थी

> सामाजिक क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून काम करीत आहे. पीएच.डी. पदवी घेतल्याने समाजाप्रतीची जबाबदारी वाढली आहे. नव्या पिढीने आदर्श घेऊन वाटचाल करावी.
>
> **- डॉ. प्रियदर्शनी चोरगे**

विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वाटण्यास सुरुवात झाली. प्रमाणपत्र घेतल्यानंतरचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता. अशातच आपले जुने मित्र-मैत्रिणी भेटल्यानंतर एकच जल्लोष सुरू झाला. गप्पा-टप्पांना जोर आला. जुन्या आठवणीत मित्र-मैत्रिणी रमून गेले.

शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याभोवती व्यावसायिक छायचित्रकारांनी स्टॉल उभारले होते. पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर मुख्य इमारतीसमोर अश्वारूढ पुतळ्याजवळ छायाचित्र काढण्यासाठी विद्यार्थ्यांची गर्दी उसळली होती. काहीजण

सेल्फी घेण्यात गुंग झाले होते. सेल्फी घेतल्यानंतर लगेच फोटो सोशल मीडियावरही शेअर केले जात होते. विद्यार्थ्यांच्या सुविधेसाठी विद्यापीठ परिसरात ठिकठिकाणी माहिती फलक लावण्यात आले होते.

चारचाकी व दुचाकीची स्वतंत्र पार्किंग व्यवस्था होती. कार्यक्रमास्थळासह ठिकठिकाणी कडकपोलिसबंदोबस्ततैनातकरण्यात आला होता. प्रत्येकाची तपासणी करूनच प्रवेश दिला जात होता. याशिवाय रुग्णवाहिका, अग्निशमन यंत्रणा, पाणी टँकर, सुरक्षा रक्षक तैनात होते.

**दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन व विक्री**

विद्यापीठ आवारात ग्रंथ प्रदर्शनाची मांडणी करण्यात आली होती. प्रदर्शनात ३० स्टॉल होते. शिवाजी विद्यापीठाकडून दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन व विक्रीचा स्टॉल उभा केला होता. यामध्ये ताराबाईकालीन कागदपत्रे, तुकारामांच्या गाथेचे निरुपण, लोकनेते बाळासाहेब देसाई जीवन आणि कार्य, शिवचरित्र एक अभ्यास आदी १२२ दुर्मीळ ग्रंथ प्रदर्शनात होते. शैक्षणिक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, कला, क्रीडा पुस्तकांसह दुर्मीळ ग्रंथांच्या खरेदीसाठी विद्यार्थी, पालकांनी गर्दी केली होती. याठिकाणी खाद्य स्टॉलही उभारण्यात आले होते.

गेल्या वर्षापासून महाविद्यालय स्तरावर दीक्षान्त समारंभ होत आहे. विद्यापीठात केवळ अधिविभागातील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. त्यामुळे गतवर्षी तुलनेत यावर्षी विद्यापीठ परिसरात गर्दी जमली नाही. याबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. ०७-०२-२०२०
तरुण भारत




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभामध्ये बोलताना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी. व्यासपीठावर उपस्थित विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे आदी. दुसऱ्या छायाचित्रात यंदाचे राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता कोल्हापूरच्या अभिषेक श्रीराम दादासाहेब याला राज्यपालांच्या यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तिसऱ्या छायाचित्रात यंदाचे कुलपतिपदक विजेत्या साताऱ्याच्या कीर्ती दत्तात्रय ननवरे हिला सन्मानित करण्यात आले.

# ध्येयपूर्तीसाठी समर्पित वृत्ती जोपासा !

## राज्यपाल कोश्यारी यांचे विद्यार्थ्यांना आवाहन: शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात ४३ पीएचडी धारकांसह दोन हजार स्नातकांना पदवी वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतानाच आपले ध्येय निश्चित केले पाहिजे. आव्हानांना सामोरे जात ध्येय गाठण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत, कष्ट, त्याग, इच्छाशक्ती आणि समर्पित वृत्ती जोपासावी. आई, मातृभाषा, मातृभूमी आणि पर्यावरण यांच्या प्रती आदर बाळगून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गुरुवारी केले. शिवाजी विद्यापीठाचा ५६ व्या दीक्षांत समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. समारंभामध्ये राष्ट्रपती सुवर्णपदकविजेता अभिषेक श्रीराम दादासाहेब, कुलपतिपदक विजेती कीर्ती दत्तात्रय ननवरे यांच्यासह ४३ पीएचडी धारकांना पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

### राजर्षी शाहू गौरव ग्रंथ देऊन राज्यपालांचे स्वागत

गुरुवारी सकाळी उजळाईवाडी विमानतळावर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे राजर्षी शाहू गौरव ग्रंथ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी आमदार चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख, जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अजय माने उपस्थित होते.

जगासमोर आज जागतिक तापमानवाढीचे संकट उभे आहे. याला सामूहिक प्रयत्नातून रोखणे काळाची गरज बनली आहे. आज पर्यावरणसंतुलन सर्वार्थाने महत्त्वाचे आहे यासाठी स्वच्छता आणि प्लास्टिकमुक्तीचा संकल्प सर्वांनी करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच स्वच्छता आणि पर्यावरण जोपासण्यास प्राधान्य द्यावे, असा सल्लाही त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी स्वागत करून शिवाजी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल सादर केला. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात यंदाच्या दीक्षांत समारंभात सर्वोच्च म्हणजे ६० हजार १६७ पदवी प्रमाणपत्रांची संख्या आहे. ही विशेष आनंदाची बाब आहे. त्यांनी यावेळी विद्यापीठाच्या कार्याचा आणि उपक्रमांचा आढावा घेतला. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी पदवी, पदविका व प्रमाणपत्रांच्या यादीचे वाचन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मश्री शिवराम भोजे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू बी. पी. साबळे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी अजय माने, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील आदिसह मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
दि. ०७-०२-२०२०

तरुण भारत





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभप्रसंगी बोलताना विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित जनसमुदाय. (छाया : इम्रान गवंडी)

# उच्च शिक्षणात गुणात्मक बदल घडविणार

## प्रा. डॉ. भूषण पटवर्धन : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थी केंद्रबिंदू मानून गुणात्मक सुधारणा घडवण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण पाऊले विद्यापीठ अनुदान आयोगाने उचलली आहेत. यामध्ये नॅशनल ॲकॅडेमिक क्रेडिट बँक (एनएसी) आणि सेमिस्टर आउटरीच प्रोग्राम (एसओपी) यासह दहा विषयांचा समावेश आहे. पूर्वीच्या गुरुकुल शिक्षण प्रणालीमध्ये तंत्रज्ञान वापरुन गुरुकुल शिक्षण पद्धतीकडे वळण्याची गरज आहे, असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचा ५६ व्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

राजमाता जिजाऊ सभागृहात दीक्षांत समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंग कोश्यारी होते. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

या वेळी प्रा. डॉ. पटवर्धन म्हणाले, विद्यपीठ अनुदान आयोगाच्या स्ट्राईक

संबंधित वृत्त पान पाच व
कोल्हापूर दिनांकमध्ये

योजनेमध्ये राज्यभरातून एकमेव शिवाजी विद्यापीठाची निवड झाली आहे. विद्यापीठात शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात, असेही त्यांनी नमूद केले. पारंपारिक अभ्यासक्रम विद्यार्थ्यांवर लादून विद्यार्थी कुशलतेने उत्तरे देतील; पण यातून शैक्षणिक प्रगती होतेच असे नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षणावर फक्त प्राध्यापकांची मक्तेदारी असल्यासारखे प्राध्यापक सध्या वागत आहेत. मात्र आजच्या जगात विद्यार्थ्यांकडूनही खूप काही शिकण्यासारखे असते. याचाही विचार होणें गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यार्थी उदबोधन शिबीर, शिक्षण परिणाम आधारीत अभ्यासक्रम, आयसीटीचा वापर, विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्य, सामाजिक व उद्योग एकत्रिकरण, मूल्यांकन सुधारणा,करिअर प्रगती, विद्याशाखा विकास, मान्यता प्रक्रिया बळकट करण्यासह शिक्षक व विद्यार्थ्यांद्वारे संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी नवीन योजना जाहीर केली असल्याचेही प्रा. डॉ. पटवर्धन यांनी यावेळी सांगितले.

### दिलदार कोल्हापूर ...

कोल्हापूर शहर दिलदार आहे. येथील माणसेही दिलदार आहेत. कोल्हापूर शहर एक रोल मॉडिल आहे. येथील दूध, कुस्ती यासह कोल्हापूरातील प्रत्येक गोष्ट रोल मॉडिल आहे. याचे अनुकरण करणे गरजेचे आहे. जयहिंद जय महाराष्ट्र जय कोल्हापूर अशा शब्दात प्रा. डॉ. पटवर्धन यांनी कोल्हापूरचा गौरव केला.

# ग्रंथदिंडीतून प्रबोधनाचा जागर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नऊवारीतील तरुणी, खादीचे कपडे घातलेले प्राध्यापक व तरुण, टाळ-मृदंगाच्या साथीत अवघा आसमंत दुमदुमून टाकणारा ज्ञानोबा-तुकोबांचा जयघोष अशा वातावरणात निघालेल्या ग्रंथदिंडीने दीक्षान्त समारंभाच्या सोहळ्यास गुरुवारी सकाळी सुरुवात झाली.

कमला कॉलेज येथून सकाळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन करून दिंडीस प्रारंभ झाला. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या पारंपरिक वेशभूषा, वाचनसंस्कृतीचा संदेश देणारे फलक हातात घेऊन युवक-युवतींनी ग्रंथदिंडीच्या माध्यमातून प्रबोधनाचा जागर केला.

राजारामपुरी पहिली गल्ली, माउली पुतळा चौक, सायबर चौक, दूरशिक्षण केंद्रामार्गे दिंडी विद्यापीठात आली. दिंडीच्या अग्रभागी फुलांनी सजविलेल्या पालखीमध्ये ग्रंथ ठेवले होते. वाचनसंस्कृतीबाबत प्रबोधन करणाऱ्या फलकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी शहरवासीयांचे लक्ष वेधले.

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर दिंडी आल्यानंतर येथे महिला, कर्मचारी व मुलींनी ग्रंथदिंडी खांद्यावर घेतली. त्यानंतर लोककला केंद्रात ग्रंथदिंडीतील पालखी ठेवली. या ग्रंथदिंडीत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कमला कॉलेज येथून कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन करुन दिंडीस प्रारंभ झाला. यात प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

## मान्यवरांनी धरला ठेका

वाचनसंस्कृती संवर्धनासाठीची घोषवाक्ये लक्ष वेधून घेत होती. दिंडीत विद्यार्थ्यांसह प्राध्यापकही पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाले होते. लेझीम आणि ढोलताशांच्या तालावर मान्यवरांनी ठेका धरला.

## पथनाट्यांतून जागृती

ग्रंथदिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी पथनाट्यांद्वारे जनजागृती केली. कॉमर्स कॉलेजने 'स्त्रीभ्रूण हत्या' या विषयावर पथनाट्य चौकाचौकांत सादर केले.

# पारंपरिक वाद्यांच्या गजरात ग्रंथदिंडी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त कमला कॉलेज ते शिवाजी विद्यापीठ अशी ग्रंथदिंडी काढण्यात आली. याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते ग्रंथ पूजनाने झाले. बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयातर्फे आयोजित ग्रंथदिंडीत ढोल, ताशा, टाळ पारंपरिक वाद्यांनी वातावरण भारून टाकले.

पारंपरिक वेशभूषा आणि शिवाजी विद्यापीठ ग्रंथ महोत्सव लिहिलेल्या गांधी टोप्या परिधान करून विद्यार्थी दिंडीत सहभागी होते. कमला कॉलेज, जनता बाजार, राजारामपुरी, माऊली पुतळा ते शिवाजी विद्यापीठाच्या जिजाऊ बहुद्देशीय पदवीदान सभागृहात दिंडीची सांगता झाली. या प्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, क्रांतिकुमार पाटील, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता बी. खोत, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. शिवराज थोरात, डॉ. सचिन पाटील, डॉ. युवराज जाधव, डॉ. जयभाये, डॉ. डी. के. गायकवाड आणि कमला कॉलेजचे प्राचार्य व इतर मान्यवर उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथदिंडी.** **(छाया : पांडुरंग पाटील)**

# शिक्षण प्रणालीच्या पुनर्विचाराची गरज

## शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्यात 'यूजीसी'चे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम

**'वर्षांनुवर्षे एका विशिष्ट चौकटीत दिले जाणारे शिक्षण विद्यार्थ्यांच्या माथी मारले जात आहे. सध्याची शिक्षण पद्धती एका चाकोरीमध्ये अडकली असून, केवळ गुणांच्या स्पर्धेत टिकणारे शिक्षण दिले जात आहे. अशा कालबाह्य शिक्षणाचा साचा मोडून भारतीय शिक्षण प्रणालीचा पुनर्विचार करण्याची गरज आहे,' असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले.**



अमित गद्रे

शिवाजी विद्यापीठाचा ५६वा दीक्षान्त समारंभ गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ सभागृहात अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते व डॉ. पटवर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रपती सुवर्णपदक कला, क्रीडा, वर्तणूक, गुणवत्ता यामध्ये आदर्श ठरलेल्या अभिषेक श्रीराम या विद्यार्थ्यास प्रदान करण्यात आले. संस्कृत विषयात विद्यापीठात सर्वप्रथम आलेल्या कीर्ती ननवरे या विद्यार्थिनीस कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. तसेच संशोधक व पदवीधर स्नातक यांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी डॉ. पटवर्धन यांनी आजच्या शिक्षण प्रणालीच्या बदलांची गरज आपल्या भाषणातून अधोरेखित केली. डॉ. पटवर्धन म्हणाले, 'सध्याची शिक्षण पद्धती ही शिक्षणसंस्था व शिक्षक यांना जे शिकवता येते तेच विद्यार्थ्यांनी शिकावे अशा प्रकारची एकांगी आहे. शिक्षकांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमानुसार अभ्यास करा, नमुना उत्तराप्रमाणे उत्तर लिहा या चौकटीच विद्यार्थी शिकतो. त्याला कधीच विचारले जात नाही की, तुला काय शिकायला आवडेल. त्यामुळे, शिक्षण म्हणजे संस्था व शिक्षक यांची मक्तेदारी झाली आहे. अशा प्रणालीतून बाहेर पडणारा विद्यार्थी केवळ मशीन बनत आहे. शिक्षण व्यवस्थेची ही शोकांतिका आहे. नव्या भारतासाठी नव्या शिक्षण प्रणालीची रचना करण्यासाठी आता शिक्षकांनीच आपला दृष्टीकोन बदलला पाहिजे.'

### सेल्फी...ग्रुप फोटोला उधाण

विद्यापीठाचा निरोप घेऊन वर्ष उलटून गेल्यावर दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने अनेक मित्र-मैत्रीणी गुरुवारी भेटले. त्यामुळे प्रमाणपत्रासोबत सेल्फी काढून तसेच अधिविभाग, ग्रंथालयासह विद्यापीठातील आवडीच्या जागांवर जाऊन फोटो काढण्यात तरुणाई रंगून गेली होती. शिवाजी विद्यापीठातील उद्यानातही विद्यार्थी फोटो काढत होते. त्यामुळे वातावरण उत्साही झाले होते.

शिक्षणातून बदलाचा प्रवाह अजून वेगवान झालेला नाही. प्रामाणिक शिक्षक कमी होत आहेत. शिक्षकांनी आता निद्रीस्त अवस्थेतून बाहेर पडावे. शिक्षण प्रक्रियेतील श्रीमंत व गरीब ही दरी मिटली पाहिजे. आर्थिक विभाजनाशिवाय डिजिटल समस्यांकडे लक्ष वेधण्याची गरज असून, टिकावू तत्त्वे व मानवी मूल्यांवर आधारीत गुरूकुलाच्या पार्श्वभूमीवरील शिक्षण प्रणाली पुन्हा आस्तित्वात आली पाहिजे. विद्यापीठातील युवा सहभाग हा विधायक कार्यासाठीचे एक पाऊल असून, तो भविष्यकाळात जागतिक विचारांना चालना देणारा ऊर्जा स्त्रोत ठरू शकतो. शिवाजी विद्यापीठातील वातावरण जलस्त्रोत, जैवविविधतेमुळे समृद्ध झाले आहे, असेही डॉ. पटवर्धन यांनी नमूद केले.

### विद्यार्थ्यांना अनौपचारिक शिकू द्या

विद्यापीठ अनुदान आयोग सध्या विद्यार्थी केंद्री शिक्षण पद्धतीच्या रचनेवर काम करीत आहे. विद्यार्थ्यांची क्षमता, कल्पकता समजून घेऊन त्यांना स्वारस्य असलेल्या विषयात शिकण्याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देण्यासाठी 'सेमिस्टर आऊटरिच प्रोग्रॅम' ही संकल्पना कार्यान्वित करणार आहे. यामध्ये एका सेमिस्टरमध्ये विद्यार्थी त्याला आवडणाऱ्या विषयातील शिक्षणासाठी समाजाच्या प्रवाहात जाऊन शिकेल, अशी मोकळीक त्याला दिली जाईल. ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांच्या क्षमता व आवडीनुसार त्यांना अवांतर व अनौपचारीक शिकण्याची संधी दिली जाईल. अनुभव, संवाद या माध्यमातून विद्यार्थी शैक्षणिकदृष्ट्या कसे घडतील, असा प्रयत्न केला जाणार आहे. तसेच सुटीच्या काळात कलेकडे ओढा असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या कलेचे शिक्षण घ्यावे व त्याचे तपशील जमा करावेत यासाठी नॅशनल अॅकेडमिक क्रेडिट बँक सुरू करण्यात येणार आहे. पदवीच्या कालावधीत विद्यार्थी त्यांच्या कलागुणांचे खाते भरतील, त्याचे गुण त्यांना दिले जातील. यासाठी पदवी पूर्ण करण्याचा कालावधी तीन ऐवजी पाच वर्षे झाला किंवा दोन वर्षातच विद्यार्थ्याने पदवी पूर्ण केली तरी त्याला प्रमाणपत्र दिले जाईल, याबाबत यूजीसीचे काम सुरू आहे, असेही डॉ. पटवर्धन म्हणाले.

### डी. लिट. मान्यवरांचे पोस्टर्स

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आजपर्यंत डी. लिट. या पदवीने सन्मानित केलेल्या गौरवमूर्तींचे पोस्टर्स व त्यांच्या कार्यक्षेत्राची माहिती मिरवणूक मार्गात प्रदर्शित करण्यात आली होती. यामध्ये माधवराव बागल, डॉ. व्ही. टी. पाटील, नागनाथअण्णा नायकवडी यांच्यासह अनेक मान्यवर व्यक्तींची पोस्टर्स लावण्यात आली होती. विद्यार्थी या पोस्टरजवळ थांबून डी. लिट मिळालेल्या व्यक्तींची माहिती वाचत होते.

▶▶ आणखी वृत्त...२

# विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय जोपासावे

भारतमातेचाही आदर करावा, असे आवाहन करून राज्यपाल कोश्यारी म्हणाले, आई, मातृभाषा, पर्यावरण आणि भारतमाता या चार मातांना मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. पर्यावरण जोपासून जागतिक तापमान वाढीचे संकट रोखण्याकामी विद्यार्थ्यांनी सक्रिय योगदान द्यावे. कोल्हापूर राज्यातील सर्वात स्वच्छ आणि प्लास्टिकमुक्त शहर बनवून कोल्हापूरकरांनी इतिहास घडवावा. दीक्षांत समारंभास कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष डॉ. योगेश जाधव, ज्येष्ठ अनुशास्त्रज्ञ पद्मश्री शिवराम भोजे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू बी. पी. साबळे, जिल्हाधिकारी दौलत देसाई, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी अजय माने, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे आदी मान्यवर उपस्थित होते.

# सेल्फी वुईथ युनिव्हर्सिटी !

## पदवी घेतल्यानंतर मित्र-मैत्रिणींसह सेलिब्रेशन

कोल्हापूर, ता. ६ : प्रत्यक्ष व्यासपीठावर जाऊन पदवी स्वीकारता नाही आली म्हणून काय झाले? शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात पदवी स्वीकारली आणि ती स्वीकारल्यानंतर मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवरायांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यासमोर उभे राहून फोटो काढला नाही तर ते नवलच! असेच चित्र आज शिवाजी विद्यापीठ परिसराने अनुभवले.

निमित्त होते, विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्याचे. दरम्यान, राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात मुख्य दीक्षान्त सोहळा सजला. या सोहळ्यालाही भव्यतेची झालर लाभली.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच ६० हजारांहून अधिक इतक्या मोठ्या संख्येने स्नातकांनी पदवी स्वीकारल्या. मात्र, प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी स्वीकारणाऱ्यांची संख्या २०६५ इतकीच होती. त्यातीलही काही निवडक स्नातकांनाच व्यासपीठावर पदवी प्रमाणपत्रे देण्यात आली.

मुख्य सोहळ्यापूर्वी आणि नंतर विद्यापीठ परिसरात विविध ठिकाणी पदवी प्रमाणपत्रांचे वितरण झाले. येथे पदवी घेतल्यानंतर सगळ्यांचा मोर्चा मुख्य इमारतीसमोर वळायचा. येथे एका मिनिटात फोटोंची सुविधा उपलब्ध होती. साहजिकच स्वतः आणि मित्र-मैत्रिणींबरोबर येथे फोटोसेशन रंगले. फोटोमध्ये विद्यापीठाची मुख्य इमारत पूर्ण यावी, यासाठी स्टूलवर उभे राहून फोटो काढण्याची युक्तीही येथे यशस्वी ठरली.

त्याशिवाय मुख्य इमारत आणि छत्रपती शिवरायांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याबरोबर सेल्फी घेण्याचीही धांदल उडाली.

एकीकडे असे सेलिब्रेशन सुरू असले तरी मुख्य दीक्षान्त मंडपासमोर आयोजित ग्रंथ महोत्सवालाही मोठ्या संख्येने अनेकांनी हजेरी लावली.

### खादी पोशाख आवाहनाला प्रतिसाद

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रानुसार दीक्षान्त सोहळ्याला विद्यार्थ्यांनी खादी पोशाख घालून उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाने केले होते. या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. त्याचवेळी व्यासपीठावर ज्यांनी पदवी घेतली, त्यांनीही खादीचे कपडे आणि भगव्या रंगाचे मानवस्त्र परिधान केले होते.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि.०७-०२-२०२०

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासोबत पीएच. डी. पदवीप्राप्त विद्यार्थी.



पदवी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सेल्फीत आनंद कैद करताना विद्यार्थी व विद्यार्थिनी.



पदवी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर एकमेकींना शुभेच्छा देत प्रमाणपत्र पाहताना विद्यार्थीनी.



## सेल्फी वुईथ डिग्री...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त सोहळा गुरुवारी झाला. पदवी प्रमाणपत्र स्वीकारल्यानंतर मित्र-मैत्रिणींसोबत असे सेल्फी सेलिब्रेशन सजले.

(अन्य छायाचित्र व बातमी पान ९ वर)

(बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# दर्जा वाढेल; संशोधन, तंत्रज्ञानासाठी फायदा

## यूजीसीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांचे प्रतिपादन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशाच्या अर्थसंकल्पात यंदा शिक्षणात थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावर वेगवेगळी मतमतांतरे असली, तरी शिक्षणातील एफडीआयमुळे शिक्षणाचा दर्जा वाढणार असून, थेट आतंरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळेल. जगात केवळ गुणवत्तेचाच बोलबाला असून, देशात पायाभूत सुविधा, संशोधन, तंत्रज्ञानासाठी परकीय गुंतवणुकीचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी दिली आहे.

डॉ. पटवर्धन म्हणाले, गुणवत्तेसाठी नेहमी स्पर्धेची गरज असते. स्पर्धात्मक दृष्टिकोनामुळे जागतिक दर्जाचे शिक्षण मिळण्याची संधी उपलब्ध होईल. आज जगात गुणवत्तेला महत्त्व आहे. त्यामुळे जागतिक दर्जाची गुणवत्ता शिक्षणात येण्याची गरज आहे. जागतिक दर्जाचे शिक्षण देशात मिळायला लागल्यानंतर स्पर्धात्मक वातावरण तयार होईल. यातून निकोप स्पर्धा होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शिक्षणात परकीय गुंतवणुकीची आवश्यकता आहे.

देशात थेट परकीय गुंतवणूक होत असताना देशातील किती विद्यार्थी या ठिकाणी प्रवेश घेणार आणि त्यांना ते परवडणार का, याचा ताळमेळदेखील पाहावा लागणार आहे. त्याचा ताळमेळ बसला तर शिक्षणातील परकीय गुंतवणूक परवडण्यासारखी आहे; परंतु यातून शिक्षणाचे बाजारीकरण वाढले तर ते आपल्या देशाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. कारण शिक्षण हे बाजारीकरणाचे असू नये, अशी आपली मूलभूत संकल्पना आहे. सध्या देशात स्पर्धाच नाही. त्यामुळे एक स्पर्धात्मक वातावरण करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. थेट परकीय गुंतवणुकीचे वाईट परिणाम होणार नाही. यासाठी रेग्युलेशन करताना अपेक्षित काळजी घेतली जाणार आहे.

परकीय गुंतवणुकीमुळे पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ शकते. प्रगत राष्ट्रांमधील मोठी विद्यापीठे या देशात येऊ शकतात. सरकारला शिक्षणामध्ये गुंतवणूक करण्यात जर मर्यादा येत असतील, तर ती उणीव भरून काढणे गरजेचे आहे. त्यासाठी परकीय गुंतवणूक हा एक चांगला मार्ग होऊ शकतो. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, संशोधन यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ शकते. देशात गुणवंत विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर आहेत. बुद्धिमत्ता ही कोणा एका समाजाची मक्तेदारी नाही. त्यामुळे सर्वांना समान संधी मिळणे गरजेचे आहे; परंतु आपल्याकडे सरकारी आणि खासगी शैक्षणिक व्यवस्था आहे. या दोन्ही व्यवस्थांमध्ये चांगले-वाईट दोन्ही आहेत; परंतु आपल्याकडे गुणवत्तेच्या आधारे विभागणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी गुणवत्ता हाच निकष असणे गरजेचे आहे आणि गुणवत्तेसाठी स्पर्धा होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे गुणवत्तेचा दर्जा वाढविण्यासाठी शिक्षणात थेट परकीय गुंतवणुकीशिवाय पर्याय नाही, असे देखील डॉ. पटवर्धन यांनी स्पष्ट केले.

# खंडपीठासाठी न्यायमूर्तींशी संवाद साधणार

## राज्यपाल कोश्यारी यांचे वकिलांच्या शिष्टमंडळाला आश्वासन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

मुंबई उच्च न्यायालयाचे कोल्हापुरात सर्किट बेंच स्थापन व्हावे या मागणीसंदर्भात उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींशी संवाद साधतो, असे आश्वासन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी गुरुवारी कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनच्या शिष्टमंडळाला दिले. मागणीचे निवेदन बार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी शिवाजी विद्यापीठ येथे राज्यपाल कोश्यारी यांना भेटून दिले.

कोल्हापूरसह सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांतील एकूण १ कोटी ७५ लाख लोकांसाठी हे खंडपीठ होणे ▶▶ पान ७ वर



कोल्हापूर : खंडपीठाबाबतच्या मागणीचे निवेदन राज्यपाल कोश्यारी यांना देताना जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. रणजित गावडे, ॲड. गुरुप्रसाद माळकर, ॲड. वैभव गावडे आदी.

# अस्सल साहित्याचा पुरस्काराने गौरव

कोल्हापूर टाइम्स टीम

उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांत दक्षिण महाराष्ट्राने बाजी मारली. किरण गुरव, मेघा पानसरे, डॉ. द. ता. भोसले यांच्यासह सांगलीतील डॉ. व्यंकटेश जंबगी यांना वाङ्मय पुरस्कारांची घोषणा झाली. या पुरस्कारांमुळे वाङ्मय निर्मितीला चालना मिळाली असून, वाङ्मय चळवळ आणि नवलेखकांना उर्जा मिळाल्याच्या भावना साहित्यप्रेमींकडून व्यक्त होत आहेत.



मेघा पानसरे



किरण गुरव

**चौघांच्या समावेशाने साहित्य क्षेत्रात उत्साह**

### सांस्कृतिक दुवा साधणारा अनुवाद

शिवाजी विद्यापीठात रशियन भाषा विभागप्रमुख व सहायक प्राध्यापक पदावर काम करणाऱ्या मेघा पानसरे यांच्या 'सोवियत रशियन कथा' या अनुवादित पुस्तकाला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार जाहीर झाला. प्रा. पानसरे यांनी रशिया आणि भारत या दोन देशांच्या सांस्कृतिक देवाण-घेवाणीचा दुवा बनण्याचे काम केले आहे. साहित्याच्या माध्यमातून त्या रशियन संस्कृती, जीवनशैली, विचार मराठीत मांडत आहेत. १८९२ ते १९८२ या काळातील महत्त्वाच्या रशियन लेखकांच्या १७ कथांचा त्यांनी अनुवाद केला आहे. याशिवाय मॅक्झिम गॉर्की यांच्या 'द लोअर डेप्थस', या नाटकाचा 'तळघर' या नावाने मराठीत अनुवाद केला आहे. 'गाणारे पीस' या बालकथांचा अनुवाद केला. अनुवादाच्या माध्यमातून दोन्ही देशातील सांस्कृतिक दुवा बनण्याची संधी मिळाली, अशा भावना त्यांना पुरस्कार जाहीर झाल्यानंतर व्यक्त केल्या.

### उपेक्षितांचे दु:ख मांडणारा साहित्यिक

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. द. ता. भोसले यांनी विपुल लेखन केले आहे. विशेषतः त्यामध्ये कथा, कादंबरी, समीक्षा, ललितादी लेखनाचा समावेश आहे. ग्रामीण जीवन, शेतकरी, शेत, शेतमजूर, तेथील संस्कृती, ताणतणाव आदी विविध समस्या, माणसाची भूक, दारिद्र्य हे त्यांच्या 'वावटळ' 'नाथा वामन', 'अन्न', अशा विविध कथांमधून दिसते. त्यांनी लिहिलेल्या लेखमालेवर आधारित 'संवाद बळीराजा'साठी या पुस्तकाला त्यांना यंदाचा राज्य वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला आहे.

### बदलत्या काळाचा वेध घेणारे 'जुगाड'

उत्कृष्ट मराठी वाङ्.मय निर्मितीसाठी देण्यात येणारा ह. ना. आपटे पुरस्कार कोल्हापुरातील किरण गुरव यांच्या 'जुगाड' या कादंबरीला जाहीर झाला. गुरव हे शिवाजी विद्यापीठात विशेष कक्ष विभागात अधीक्षकपदावर कार्यरत आहेत. त्यांनी डीएमई ही पदवी संपादन केली असून, सध्या ते 'साहित्य निर्मिती प्रक्रियेचा मानसशास्त्रीय अभ्यास' याविषयात पीएच.डी.पदवीसाठी संशोधन करीत आहेत. आजपर्यंत गुरव यांचे 'राखीव सावल्यांचा खेळ', 'श्रीलीपी', 'बाळूच्या अवस्थांतराची डायरी' हे कथासंग्रह आणि 'जुगाड' ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. 'क्षुधाशांती' हा कथासंग्रह व 'गस्त...रात्र पहाऱ्याची प्रकरणे' ही कादंबरी प्रकाशनाच्या मार्गावर आहे. बदलत्या काळातील जगण्याचा नेमका वेध घेणारा लेखक म्हणून गुरव यांची ओळख आहे.

# ‘जुगाड’ कादंबरीस ह. ना. आपटे पुरस्कार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



शासनाकडून उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी देण्यात येणारा ह. ना. आपटे पुरस्कार लेखक किरण गुरव यांच्या ‘जुगाड’ यांच्या कादंबरीस जाहीर झाला. गुरव हे शिवाजी विद्यापीठात अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. बुधवारी राज्य शासनातर्फे ३५ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. त्यांच्या ‘जुगाड’ या कादंबरीचा समावेश शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए., तर मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यासक्रमात झाला आहे. मराठवाडा साहित्य परिषदेचा २०१८ चा बी. रघुनाथ उत्कृष्ट साहित्यनिर्मिती पुरस्कार ‘जुगाड’ला प्राप्त झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Dt. 07-02-2020

Times of India

# Over 2,000 students attend convocation

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** As many as 2,000 students of SUK's department of technology, physics, mathematics, biology, humanities, Centre for Distance Education of SUK, attended the convocation on Thursday.

According to the varsity officials, around 2,050 students of the in-house departments received the degree certificates.

Notably, due to the recent changes in the convocation ceremony under the Maharashtra Universities Act, 2016, the affiliated colleges of the SUK have been asked to conduct their separate ceremony to distribute the certificates.

Virbhadra Rakshe, an MSc graduate, said that the change this year is simple and minimalist. With the graduation ceremony in the respective colleges, the bustle that the varsity campus used to witness on the convocation day is missing.

Prerana Sardar, another graduate student, said that holding the degree certificate in the campus was the proudest moment of her life.

A photographer said that due to the recent changes in the graduation ceremony, the turnout has taken a major hit.

# क्षणचित्रे विद्यापीठ पदवीप्र

## ग्रंथांनी सजली पालखी

शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभानिमित्ताने गेल्या १४ वर्षांपासून सुरू असलेला ग्रंथदिंडी शिरस्ता यंदाही उत्साहात पार पडला. फुलांनी सुशोभित केलेल्या पालखीत वैचारिक ग्रंथांच्या प्रती ठेवून काढण्यात आलेल्या दिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश देणाऱ्या फलकांचे प्रदर्शन केले. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रातर्फे काढण्यात आलेल्या या दिंडीचे पूजन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते, कमला कॉलेज येथील डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनच्या प्रांगणात झाले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, प्राचार्य क्रांतीकुमार पाटील, लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, ग्रंथालयाच्या संचालक डॉ. नमिता खोत, संचालक डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. शिवराज थोरात, डॉ. सचिन पाटील, डॉ. युवराज जाधव, डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते.

या वेळी ढोल, ताशा, टाळ या पारंपारीक वाद्याच्या गजरात ग्रंथदिंडीने शिवाजी विद्यापीठाकडे प्रस्थान केले. ग्रंथदिंडीमध्ये विविध प्रकारचे सामाजिक संदेश देणारे फलक, सामाजिक विषयावरचे पथनाट्ये विशेष लक्ष वेधून घेत होते. व्यायाम शरीराला सुदृढ करतो तसेच वाचन हे मन व विचारांना प्रगल्भ करतात, अशा आशयाचे फलक विद्यार्थ्यांनी दिंडीमध्ये आणले होते. कपाळी टीळा, डोक्यावर टोपी, हातात टाळ, अशा वातावरणात वाचन चळवळीचे अभंग गात दिंडी काढण्यात आली. ढोल-ताशे-टाळ या वाद्यांच्या गजरात राजारामपुरी, आईचा पुतळा, सायबर रोड मार्गे ग्रंथदिंडीचे विसर्जन राजमाता जिजाऊ सभागृहात झाले.



**ग्रंथमहोत्सवास प्रतिसाद**

दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने भरवण्यात आलेल्या ग्रंथ महोत्सवास विद्यार्थी, प्राध्यापक व पालकांनी प्रतिसाद दिला. विविध विषयांवरील पुस्तके वाचून विद्यार्थी खरेदी करीत होते. नवे उद्योग, करिअर, यशोगाथा, वेळेचे व्यवस्थापन या विषयावरील पुस्तकांच्या खरेदीला चांगला प्रतिसाद मिळाला.



**खादीचा बोलबाला**

यंदा दीक्षान्त समारंभात खादीचा प्रसार करण्यासाठी खादीचे वस्त्र परिधान करावे, असे आवाहन विद्यापीठ अनुदान आयोगाने केले होते. त्या नुसार अधिकारी वर्ग व पुरस्कारप्राप्त विद्यार्थी, व्यासपीठावर पदवी स्वीकारणारे स्नातक व संशोधक यांनी पांढरा खादी कुर्ता, निळ्या रंगाचे जॅकेट व भगव्या रंगाचा स्टोल, असा ड्रेसकोड परिधान केला होता.

### प्रमाणपत्र वितरण कक्षात शांतता

विद्यापीठाच्या दीक्षांन्त समारंभात दोन हजार विद्यार्थीच पदवी प्रमाणपत्र स्वीकारणार होते. त्यात ही गुरुवारी प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या एक हजारांच्या आसपास होती. त्यामुळे प्रमाणपत्र वितरण कक्षात विद्यार्थ्यांची झुंबड उडाली नसल्याने शांततेत वितरण झाले.

### पसायदानाचे सूर अन् मिरवणुकीचे आगमन

सकाळी सव्वा अकरा वाजता राज्यपाल भगतसिंह कोश्यारी व डॉ. भूषण पटवर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवाजी विद्यापीठाच्या आवारातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मिरवणुकीला सुरूवात झाली. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीपासून काढण्यात आलेल्या या मिरवणुकीत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी राजदंड घेतला. या वेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह व्यवस्थापन परिषद, विद्या परिषदेचे सदस्य, अधिष्ठाता, व निवडक स्नातक व संशोधक यांचा सहभाग होता. संगीत व नाट्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी पसायदानाचे सूर आळवत दीक्षान्त मिरवणुकीचे स्वागत केले.

### पदवी प्रमाणपत्रावर उत्सुकतेने खिळली नजर

उच्च शिक्षण पूर्ण झाल्याच्या आनंदाला दीक्षान्त समारंभात घेतलेल्या पदवी प्रमाणपत्राकडे उत्सुकतेने पाहणाऱ्या नजरा खूप काही सांगून जात होत्या. संशोधनपूर्तीनंतर मिळालेले प्रमाणपत्र आनंदाने मित्र-मैत्रिणी, पालक यांना दाखवले जात होते. प्रमाणपत्र घेतल्यानंतर त्यावरील नाव, विषयासह इतर तपशीलात काही चुका नाहीत ना हे देखील आवर्जून पाहिले जात होते.

# शिक्षणावरील तरतूद वास्तवात यावी

कोल्हापूर टाइम्स टीम

गेल्या अर्थसंकल्पाच्या तुलनेत यंदा केंद्रीय अर्थसंकल्पात शिक्षणावरील आर्थिक तरतूद पाच हजार कोटींनी वाढली असली तर प्रत्यक्षात निधी स्वरूपात रक्कम येऊन शिक्षणातील विद्यार्थीकेंद्री सुविधांच्या वास्तवापासून अर्थसंकल्पातील तरतूद लांब असल्याचे दिसून येत आहे. ९९ हजार कोटींच्या आर्थिक नियोजनात

## वास्तवापासून अर्थसंकल्पातील तरतूद लांब

'अर्थसंकल्पात शिक्षणावर ९९ कोटींची तरतूद केली हे स्तुत्य आहे. मात्र शिक्षणसंस्थांना निधी देण्याची घोषणा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेवर सरकारचा अंकुश असायला हवा. उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कौशल्य विकासासाठी प्रशिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात निधी हातात आला पाहिजे.

– **डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

'शिक्षणावरील बजेटमध्ये वाढ दिवस असली तरी वास्तवात ही वाढ अपुरी आहे. शिक्षणावरील खर्च वाढत आहे, त्या तुलनेत तरतूद अजून जास्त हवी होती. नवीन शैक्षणिक धोरणाबाबत आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करून त्यानुसार आर्थिक नियोजन केल्याचे वास्तवदर्शी अंदाजपत्रकात दिसत नाही. शिक्षक, प्राध्यापकांच्या वेतन, सुविधांचे प्रश्न निधीअभावी रखडलेले आहेत.

– **सुभाष जाधव**, उपाध्यक्ष, एमफुक्टो

महाराष्ट्र टाइम्स
**अर्थसंवाद**
२०२०

'या अर्थसंकल्पात महिलांच्या उन्नतीसाठी कोणतेही उपाय, तरतूद देखील नाही. यामुळे हा संकल्प महिलांसाठी फायदेशीर नाही. पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला असता तर महिला शिक्षणाला प्रोत्साहन मिळाले असते. महिलांच्या सुरक्षिततेसाठी देखील सरकारने काहीच केले नाही.

– **प्रा. डॉ. रूपा शहा**

प्राथमिक, माध्यमिक, उच्चशिक्षण, कौशल्य विकास व स्टडी इन इंडिया यासाठी निधीचे वर्गीकरण कसे होते यावर शिक्षणविकासाचा आलेख ठरणार आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये यंदा शिक्षणावर किती बजेट राखून ठेवले आहे याकडे शिक्षण क्षेत्रातील प्रत्येकाचे लक्ष लागून राहिले होते. यंदाच्या अर्थसंकल्पातील आर्थिक तरतुदीमध्ये उच्चशिक्षण, परदेशी विद्यार्थ्यांनी भारतात शिक्षणासाठी यावे यादृष्टीने योजना, कौशल्यविकासाला पोषकता तसेच, संशोधनाला चालना, गुणवत्तेला वाव, शालेय शिक्षणाचा पाया मजबूत करणारे उपक्रम, प्रयोगशील प्रशिक्षण, फेलोशिप, शिष्यवृत्तींवर भर हे महत्वाचे मुद्दे आहेत. वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाच्या संधी मिळाव्यात यासाठी ऑनलाइन पदवी अभ्यासक्रमाला प्राधान्य हादेखील यंदाच्या अर्थसंकल्पातील शिक्षणविषयक प्रोत्साहनाचा चांगला मुद्दा आहे. मात्र अर्थसंकल्पात ९९ हजार कोटींचा आकडा दिसत असला तरी आजही शाळांची अवस्था, शैक्षणिक सुविधांची वानवा, शिक्षक भरती बंदीमुळे शिक्षकांच्या पुरेशा संख्येचा प्रश्न, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष यामुळे अर्थसंकल्पात तरतूद झालेल्या रकमेचे योग्य वर्गीकरण व अंमलबजावणी होणार का हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विद्यापीठस्तरावरही विद्यापीठ अनुदान आयोगाकडून मिळणाऱ्या निधी वाटपातील दिरंगाईमुळे विद्यार्थीकेंद्री विकास व योजनांना खीळ बसली आहे. गुणवत्ता व दर्जात्मक उच्चशिक्षणासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केल्याचे दिसत असले तरी निधीसाठी महाविद्यालये, विद्यापीठ प्रशासनाची ओंजळ रिकामीच राहत असल्याची पूर्वपिठीका यंदाही कायम राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

एकीकडे उच्च शिक्षणातील करिअर संधी वाढवणारे, नोकऱ्यांची निर्मिती करणारे व इंडस्ट्रीला कुशल मनुष्यबळ देणारे शिक्षण केंद्र सरकारला अपेक्षित आहे, मात्र त्यासाठी अर्थसंकल्पात केलेली तरतूद समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचवण्याची यंत्रणा सुस्त असल्याचेही परिणाम गेल्या पाच वर्षांत दिसून आले आहेत.

### महिला सुरक्षेला ठेंगा

गेल्या पाच ते सहा वर्षांपासून देशात महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मेट्रो शहरातच नव्हे तर गावागावातही महिला, युवती यांच्यावर अत्याचार, हल्ले होत आहेत. महिलांसाठी सुरक्षित वातावरण तयार व्हावे यासाठी कायदा व सुव्यवस्थेवरील आर्थिक खर्चाचे नियोजन वाढले पाहिजे, अशी अपेक्षा बजेटपूर्वी व्यक्त होत होती. मात्र प्रत्यक्षात अर्थसंकल्पात महिला सुरक्षेच्यादृष्टीने दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. निर्भया पथकाकडील सुरक्षायंत्रणा, मनुष्यबळ, भरती, प्रशिक्षण माहिती तंत्रज्ञानाची उपलब्धता यावर खर्चाची तरतूद न केल्याने गोंधळाची स्थिती आहे.

# विद्यापीठात आज 'कल्चरल फेस्ट'चे उद्‌घाटन

कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) : शिवाजी विद्यापीठ पत्रकारिता व संवादशास्त्र विभागामध्ये ७ व ८ फेब्रुवारी रोजी 'कल्चरल फेस्ट-२०२०' चे आयोजन करण्यात आले आहे. दि. ७ रोजी मुकुंद मरुळकर यांचा सकाळी ११ वाजता संगीताचा कार्यक्रम होणार आहे. ते प्रख्यात संगीतकार शंकर- जयकिशन यांची गीते सादर करणार आहेत. यादिवशी सांस्कृतिक वेश परिधान करून विद्यार्थी कार्यक्रमात सहभागी होतील. दि. ८ रोजी सकाळी ११ वाजता 'महिलांवरील अत्याचार थांबवा' या धर्तीवर मानवशास्त्र विभाग इमारत ते विद्यापीठ मुख्य इमारत अशी रॅली काढण्यात येणार आहे. महिलांवरील होणारे अत्याचार थांबावे, याबाबत रॅलीच्या माध्यमातून जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे. यानंतर मानवशास्त्र विभागाच्या सभागृहात पत्रकारिता व संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

# ग्रंथदिंडीद्वारे ज्ञानदेवतेचा जागर...

## हजारो स्नातकांच्या सहभागाने दिंडीला आले चैतन्याचे रूप

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आज शानदार ग्रंथदिंडी निघाली. हजारो स्नातकांच्या सहभागाने या दिंडीला चैतन्याचे रूप आले. पारंपरिक वाद्यांच्या गजरात ज्ञानदेवतेचा जागर करीत दिंडी विद्यापीठाच्या दिशेने रवाना झाली.



कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते या दिंडीचे ताराराणी विद्यापीठातील व्ही. टी. पाटील सभागृह येथे उद्‌घाटन झाले. शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, प्राध्यापक व यंदा प्रथमच पदवी घेणारे स्नातक यांच्या उत्साही सहभागाने व्ही. टी. पाटील स्मृतिभवन परिसर गर्दीने फुलून गेला. ज्ञानदेवतेचे प्रतीक असलेल्या ग्रंथ पालखीचे पूजन डॉ. शिंदे यांच्या हस्ते झाले आणि हलगी, घुमके, झांज अशा पारंपरिक वाद्यांच्या निनादात ग्रंथदिंडी गजगतीने मार्गस्थ झाली.

फुलांची उधळण करीत निघालेल्या या दिंडीत संत वाङ्‌मयापासून विज्ञान युगातील संशोधकीय प्रबंधापर्यंत ज्ञान साधना करणारे स्नातक एका रंगीत चालत होते. ज्ञानातून शिस्त आणि शिस्तीतून व्यक्तिमत्त्व विकास कसा घडतो, याची प्रचिती देत होते. राजारामपुरी, शिवाजी विद्यापीठ रोड मार्गे दिंडी निघाली. दीक्षान्त समारंभात या विद्यापीठीय ज्ञान सोहळ्याचा थाट प्रसन्नतेची साक्ष देत होता. एनसीसी, एनएसएस, ग्रंथपाल, संशोधक यांच्या सहभागाने या दिंडीचे चैतन्य क्षणोक्षणी उजळून निघाले आणि विद्यापीठाच्या आवारातच विद्यार्थी पथकाने पथनाट्य सादर करत 'बेटी बचाव, बेटी पढाव' असा संदेश दिला आणि या दिंडीला प्रबोधनाची सामाजिक कार्याची जोड लाभली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. अभय जायभाये, प्रा. डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते.

### पालकांचाही उत्साह शिगेला

आपली मुलगी, आपला मुलगा पदवीधर होणार, ज्ञानी लोकांच्या सान्निध्यात वावरणार, त्याचे भवितव्य उज्ज्वल घडणार, अशी स्वप्ने घेऊन अनेक स्नातकांचे पालक हा दीक्षान्त समारंभ आणि त्यामध्ये असलेला आपल्या पाल्याचा सहभाग अनुभवण्यासाठी आले होते. त्यांची विद्यापीठ आवारात गर्दी होती. ग्रंथदिंडी विद्यापीठ आवारात पोहचताच या पालकांच्याही डोळ्यांचे पारणे फिटले. अनेकांनी टाळ्यांच्या गजरात या ग्रंथदिंडीचे स्वागत केले.